महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

## ग्राम विकास विभाग

# राज्य व्यवस्थापन कक्ष
# ग्रामीण गृहनिर्माण




# महा आवास

## त्रैमासिक

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२०

# क्षणचित्रे




महा आवास अभियान-ग्रामीण राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी मा. मुख्यमंत्री यांचे स्वागत करतांना मा.मंत्री, ग्राम विकास




महा आवास अभियान-ग्रामीण राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी मा.मंत्री, ग्राम विकास यांचे स्वागत करतांना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण




महा आवास अभियान-ग्रामीण राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल यांचे स्वागत करतांना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण



महा आवास अभियान-ग्रामीण बाबत राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण टिमशी चर्चा करताना मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग

महा आवास
त्रैमासिक

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास विभाग

## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

## महा आवास

| | |
|---|---|
| मार्गदर्शक | **राजेश कुमार (भा.प्र.से.)** अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग |
| मुख्य संपादक | **डॉ. राजाराम दिघे,** संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण |
| प्रबंध संपादक | **मंजीरी टकले,** उपसंचालक<br>**निलेश काळे,** उपसंचालक<br>**संतोष भांड,** सहा. संचालक (लेखा) |
| कार्यकारी संपादक | **संजय घोगळे,** सहा. लेखाधिकारी<br>**दिनेश मोवळे,** प्रशिक्षण समन्वयक |
| सहाय्यक संपादक | अनिल काळे<br>संतोष पानसरे<br>राम आघाव<br>परमेश्वर शेलार<br>डॉ. संघरत्न सोनवणे<br>तौसिफ सौदागर<br>नेहा सावंत<br>मायकल जॉन |
| मुखपृष्ठ मांडणी व सजावट | **दिनेश मोवळे** प्रशिक्षण समन्वयक (माहिती, शिक्षण व सवांद) |
| मुद्रण | पॅरामिन प्रिंटर्स |
| संपादकीय पत्ता | **संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय,** ४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ |
| संकेतस्थळ | www.pmayg.nic.in<br>ww.mahaawaas.com |
| ईमेल | directoriayruralhousing@gmail.com |
| दूरध्वनी क्र. | ०२२-२७५६१८२४ |

वर्ष १ ले । अंक २ रा । ऑक्टोबर ते डिसेंबर २०२०

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संपादकीय | १ |
| २ | विशेष<br>महा आवास अभियान-ग्रामीण | ३ |
| ३ | महा आवास अभियान-ग्रामीण बाबत मान्यवरांचे संदेश | ५ |
| ४ | विविध उपक्रमांचा मागोवा<br>क्षमता बांधणी उपक्रम | ८ |
| | संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम | १० |
| | माहिती, शिक्षण व सवांद उपक्रम | १३ |
| | समन्वय उपक्रम | १६ |
| | केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित पॉलिसी इनपूट | १९ |
| ५ | गृहनिर्माण योजनांचा संचित प्रगती अहवाल<br>प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण | २० |
| | रमाई आवास योजना | २१ |
| | शबरी आवास योजना | २२ |
| | पारधी आवास योजना | २३ |
| | आदिम आवास योजना | २४ |
| | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना | २४ |
| ६ | ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम/यशोगाथा | २५ |
| ७ | डेमो हाऊस/प्रात्यक्षिक घरकुल बांधकाम मार्गदर्शक सुचना | ३१ |
| ७ | बहुमजली इमारत डिजाईन्स | ३२ |
| ८ | गृहसंकुल/घरकुल वसाहत डिजाईन्स | ३३ |
| ९ | फोटो गॅलरी | ३४ |
| १० | मिडीया कवरेज | ३५ |



महा आवास त्रैमासिकाचा दुसरा अंक आपणास देताना तसेच या अंकाच्या माध्यमातून आपणा सर्वांशी मुक्त संवाद साधण्याची संधी मिळत आहे याचा मला अत्यंत आनंद होत आहे. राज्य व्यवस्थापन कक्षाचा संचालक या पदाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर केंद्र व राज्य पुरस्कृत घरकुल योजना अधिक गतिमानतेने व गुणवत्तेने पुर्ण करण्याचे ध्येय ठरविले आहे हे ध्येय पुर्ण करण्यासाठी या अंकाच्या माध्यमातून आपणाशी विविध विषयांवर संवाद साधणार आहे.

ग्रामीण विकासाच्या विस्तृत क्षेत्रामध्ये पायाभूत सुविधांची निर्मिती, ग्रामीण शाश्वत उपजिविकेच्या साधनांची निर्मिती आणि सत्तेचे विकेंद्रीकरण हे महत्वाचे घटक आहेत. असे करताना ग्रामीण भागाच्या काही अंगभूत मर्यादांनाही सामोरे जावे लागते. जसे की, दुर्गमपणा, संवेदनशील परिसंस्था (Eco System) हे होय. असे असले तरी या मर्यादावर मात करून महाराष्ट्र या प्रगतशील राज्याने विकासाच्या प्रक्रियेत देशात सक्रिय सहभाग नोंदविला आहे.

घर म्हणजे केवळ राहण्याचे ठिकाण इतकेच मर्यादीत नाही, तर हे जीवनमानाचा आधार, सामाजिक दर्जाचे प्रतिक, सांस्कृतिक अभिव्यक्तीचा एक भाग म्हणून याकडे पाहिले पाहिजे. तसेच नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण, खाजगीपणा जपणे, मानसिक समाधान, स्वप्रशंसा व आत्मविश्वास निर्माण करण्याचे हे महत्वाचे साधन ठरल्याचे सिद्ध झाले आहे. आणि म्हणूनच समाजामध्ये सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, विधवा, अपंग, अल्पभूधारक यांना प्राधान्यांने घरकूल देणे आवश्यक आहे.

युनोच्या HABITAT AGENDA मध्ये सर्वांसाठी आवश्यक व पुरेशी राहण्याची व्यवस्था निर्माण करुन त्यांचे जीवन सुकर करणे हा महत्वाचा उद्देश होता. भारतीय राज्यघटनेतील राज्य सूचीमध्ये हा विषय दिसून येतो. यातूनच घरकुलाचे महत्व अधोरेखित होते. १९५७ मध्ये सामाजिक विकासाची चळवळ या कार्यक्रमाचा भाग म्हणून ग्रामीण गृहनिर्माण कार्यक्रम भारतामध्ये राबविण्यात आला. इंदिरा आवास योजना हा भारतातील सर्वात मोठा व कल्याणकारी कार्यक्रम म्हणून उदयास आला. याची सूरूवात १ जानेवारी १९९६ पासून स्वतंत्रपणे करण्यात आली. सन २०१६ पर्यंत ही योजना राबविण्यात येत होती. तथापी योजनेच्या काही मर्यादांमुळे यामध्ये काही बदल करून ही योजना प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण या नावाने सुरू करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने पारदर्शीपणा, सार्वजनिक आर्थिक व्यवस्थापन प्रणाली, विविध योजनांचे अभिसरण याचा समावेश करण्यात आला असल्याचे आपणास दिसून येते.

आज अखेर प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व राज्यपुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांमध्ये राज्यात एकूण ७.५ लक्ष पेक्षा अधिक घरकुले बांधून पुर्ण करण्यात आलेली आहेत. यामध्ये टक्केवारी नुसार प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये पालघर जिल्ह्याने ७७.७ टक्के घरकुले पुर्ण केली आहेत, तर संख्येनुसार नंदूरबार जिल्हयाने ६३,३९१ इतकी घरकुले पुर्ण केली आहेत. तर २० हजार पेक्षा अधिक घरकुले पुर्ण करणाऱ्या जिल्हयांमध्ये अमरावती, पालघर, भंडारा, गोंदिया, अहमदनगर, धुळे, जळगाव व नाशिक या जिल्हयांचा समावेश होतो. या जिल्ह्यांचे हार्दिक अभिनंदन. राज्याला आणखी **८.५ लक्ष घरकुले पुर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.**

या पार्श्वभूमिवर महाराष्ट्रात **महा आवास अभियान-ग्रामीणची** सुरूवात करण्यात आली आहे. सदर कार्यक्रमाच्या माध्यमातून योजना अंमलबजावणीच्या महत्वाच्या बाबी मा.मुख्यमंत्री व मा.मंत्री ग्राम विकास यांच्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. राज्य व्यवस्थापन कक्षाच्या महा आवास त्रैमासिकाचे प्रकाशन, अभियान मार्गदर्शक पुस्तीकेचे प्रकाशन, योजना माहितीची घडी पुस्तीका, पोस्टर अनावरण, माहिती शिक्षण संवाद साहित्याचे प्रकाशन, डेमो हाऊस प्रदर्शन व राज्य व्यवस्थापन कक्षाच्या लोगेचे प्रकाशन या बाबींचे प्रकाशन मा. मुख्यमंत्री व मा. मंत्री ग्राम विकास यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमांची सविस्तर माहीती या अंकामध्ये छायाचित्रांसह देण्यात आली आहे.

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२० या तीन महिन्याच्या कालावधीत महा आवास अभियान-ग्रामीण गतिमान करण्यासाठी विविध स्तरावर बैठकांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विभागीय बैठका, गवंडी प्रशिक्षणाबाबत संबंधीत संस्थांशी बैठका, मा. सचिव, आदिवासी विकास यांच्या सोबत बैठका, मा. मंत्री, ग्राम विकास यांच्या आढावा बैठका अशा विविध स्तरावरील बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकांची सविस्तर माहिती सदरच्या अंकात दिली आहे. या दरम्यानच्या काळात केंद्र शासनाच्या ग्राम विकास विभागामार्फतही योजनेच्या प्रगतीबाबत विविध आढावा बैठकांचे आयोजन करण्यात आले होते.

स्थानिक गवंडयांना प्रशिक्षीत करून त्यांची कौशल्य वृद्धी करणे, महिला गवंडी तयार करणे हे महत्वाचे आहे. या सर्वांमध्ये ग्रामपंचायतींचा सहभाग वाढविणे महत्वाचे आहे. विविध योजनांचे अभिसरण, पंचायत समिती, जिल्हा परिषदांचा सहभाग, घरकुल मार्ट, बहुमजली इमारती, गृहसंकुल, जागेचा प्रश्न सोडविणे, जॉब कार्ड मॅपिंग व आधार कार्ड मॅपिंग हे महत्वाचे उपक्रम राबवावण्यास प्राधान्य द्यावयाचे आहे.

अभियानाव्दारे ग्रामीण घरकुल योजनांच्या कार्यक्रमाला अधिक गती प्राप्त करून देण्याबरोबरच गुणवत्ता निर्माणासाठी महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन फाऊंडेशन (VSTF) यांच्या सोबत घरकुलांना पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी समन्वय, आय. आय. टी. मुंबई यांचेकडून घरकुलांच्या विविध डिजाईन व नाविन्यपुर्ण उपक्रम राबविण्यासाठी तांत्रिक सहकार्य घेण्यात येत आहे, रिलायन्स फाऊंडेशनच्या माध्यमातून योजनेतील विविध भागधारकांशी संपर्क करण्यासाठी SMS सुविधा प्राप्त करून घेण्यात येत आहेत. अभियान कालावधीत १ ते १० उपक्रम प्राधान्याने पुर्ण करण्यासाठी तालुका स्तरावरील अधिकारी/कर्मचारी तसेच गाव स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांनी लाभार्थी निहाय नियोजन करणे आवश्यक असून यातूनच घरकुले गुणवत्तापुर्ण व विहित कालावधीत पुर्ण होऊ शकतील असे वाटते. विभाग व जिल्हा स्तरावरून याचे स्वतंत्रपणे नियमित सनियंत्रण करणे आवश्यक बनले आहे.

महा आवास अभियान-ग्रामीणच्या प्रभावी अंमलबजावणी व यशस्वीतेसाठी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.मंत्री, ग्राम विकास, मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल, मा.मुख्य सचिव व मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांचे शुभेच्छा संदेश अंतर्भूत करण्यात आले आहेत.

सदरच्या अंकाबाबत आपल्या सुचनांचे स्वागत आहे. घरकुल योजनांच्या गतिमानतेत हा अंक आपणास उपयुक्त ठरेल ही अपेक्षा.

शुभेच्छासह!

**डॉ. राजाराम दिघे**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण**

# महा आवास अभियान - ग्रामीण

ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक:प्रआयो-२०२०/प्र.क्र.१०७/योजना-१०, दि. १९ नोव्हेंबर, २०२० अन्वये सन २०२०-२१ यावर्षामध्ये महाराष्ट्र राज्यात **दिनांक २० नोव्हेंबर, २०२० रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते २८ फेब्रुवारी २०२१ या १०० दिवसांच्या कालावधीत "महा आवास अभियान-ग्रामीण"** राबविण्यास शासनाने मान्यता दिली आहे. **"सर्वांसाठी घरे - २०२२"** या शासनाच्या धोरणांतर्गत अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता आणणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे.

## अभियान राबविण्याचे उद्देश

- राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे.
- ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये शासकीय यंत्रणेबरोबरच समाजातील सर्व घटक जसे- पंचायतराज संस्था, स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था, खासगी संस्था, तंत्र शिक्षण संस्था,बँका, लोकप्रतिनिधी, लाभार्थी, ग्रामस्थ इ. चा सक्रीय सहभाग वाढविणे.
- ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रामध्ये नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून घरांचा दर्जा व गुणवत्ता वाढविणे.
- ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांसाठी शासनाच्या विविध योजनांचा कृति संगम घडवून आणणे.
- राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागधारकांची क्षमता बांधणी व जन-जागृतीद्वारे लोक चळवळ उभी करणे.

## अभियान कालावधीत राबवावयाचे उपक्रम

- भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे.

अ) पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना.

ब) शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याची योजना.

क) ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना.

ड) वा इतर मार्गाने (जसे- बक्षिसपत्र) जागा उपलब्ध करुन देणे.

- घरकुलांच्या उद्दिष्टांप्रमाणे १०० टक्के मंजूरी देणे.
- मंजूर घरकुलांना पहिल्या हप्त्याचे १०० टक्के वितरण करणे.
- घरकुलांच्या उद्दिष्टानुसार १०० टक्के घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे.
- प्रलंबित घरकुले पूर्ण करणे.
- सर्व घरकुले आर्थिकदृष्ट्या पूर्ण करणे.
- ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे.
- डेमो हाऊसेस (Demo House) उभारणे.
- कायमस्वरुपी प्रतिक्षा यादीतील लाभार्थ्यांचे आधार सिडींग व आवास प्लस मधील लाभार्थ्यांचे आधार सिडींग/ जॉब कार्ड मॅपिंग १०० टक्के पूर्ण करणे.
- शासकीय योजनांशी कृती संगम -

अ) लाभार्थ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून रोजगार व स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण मधून शौचालय देणे.

ब) जल जीवन मिशन मधून नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे.

क) प्रधानमंत्री उज्वला योजने मधून गॅस जोडणी देणे.

ड) सौभाग्य योजने मधून विद्युत जोडणी देणे.

इ) राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियाना मधून उपजिविकेचे साधन देणे.

- नावीन्यपूर्ण उपक्रम-

अ) पुरेशी जागा नसल्यास बहुमजली इमारती बांधणे.

ब) पुरेशी जागा असल्यास गृहसंकुल उभारुन त्यांची सहकारी संस्था स्थापने.

क) लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी बँकेचे रु. ७०,०००/-कर्ज स्वरुपात मिळवून देणे.

ड) घरकुलांचे बांधकाम साहित्य जसे-दगड, विटा, वाळू, सिमेंट, स्टिल, छताचे साहित्य इत्यादी उपलब्ध करण्यासाठी 'घरकुल मार्ट' सुरु करुन त्यात महिला बचत गटांचा सहभाग घेणे.

इ) पंचायत राज संस्था (जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत), स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था, कॉरपोरेट संस्था, लाभार्थी व लोक सहभाग यांच्या माध्यमातून मूलभूत सुविधा देवून 'आदर्श घरांची' निर्मिती करणे.

## अभियान क्षमता बांधणी उपक्रम

भागधारकांच्या क्षमता बांधणीसाठी राज्य ते ग्राम स्तरांपर्यंत कार्यशाळा, ग्राम कृती गटाचे गठण, घरकुल बांधकाम व दर्जाबाबत लाभार्थी मेळावे, गृहकर्ज घेवू इच्छिणा-या लाभार्थ्यांसाठी बँक मेळावे इ. उपक्रमाचे आयोजन करणे.

## माहिती, शिक्षण व सवांद उपक्रम

"महा आवास अभियान-ग्रामीण" अंतर्गत राज्यात राबविण्यात येणा-या विविध घरकुल योजनांबाबत जन जागृती, प्रचार-प्रसिध्दी करण्यासठी माहिती, शिक्षण व सवांद (IEC) च्या विविध उपक्रमांचा जसे- Mass मिडीया, Outdoor मिडीया, Social मिडीया, Group मिडीया, आंतरव्यक्ती संवाद (IPC), पारंपारीक मिडीया, इ. उपक्रमांचा वापर करणे.

## संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम

अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व गाव स्तरावर समित्या कार्यरत करणे. सदर समित्यांनी राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर व गावपातळीवरुन क्षमता बांधणी कार्यशाळा, आढावा बैठका, क्षेत्रिय भेटी (Field Visits), Awaas Soft, MIS Formats, इ. द्वारे अभियानाचे संनियंत्रण व मूल्यमापन करणे.

## अभियान पुरस्कार

दि. २० नोव्हेंबर २०२० ते २८ फेब्रुवारी २०२१ हा अभियान कालावधी संपल्यावर अभियानात राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करण्यात येईल. या मूल्यमापनाच्या आधारे राज्य, विभाग, जिल्हा, तालुका, ग्रामस्तरावर उत्कृष्ट कामासाठीच्या पुरस्कारांची नामांकने काढण्यात येतील. अभियानात उत्कृष्ट काम करणारे विभाग, जिल्हे, तालुके, क्लस्टर्स, ग्रामपंचायती, लाभार्थी यांच्या कामाचा प्रशस्तीपत्र व मानचिन्ह देऊन पुढील प्रमाणे पुरस्कार देवून गौरव करण्यात येईल. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत आवास योजना करीता स्वतंत्र पुरस्कार देण्यात येतील.

### राज्यस्तरीय पुरस्कार

- सर्वोत्कृष्ट विभाग - प्रथम क्रमांक.
- सर्वोत्कृष्ट जिल्हे, सर्वोत्कृष्ट तालुके, सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत, सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत व सर्वोत्कृष्ट गृहसंकुल
- प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

### विभागस्तरीय पुरस्कार

- सर्वोत्कृष्ट तालुके, सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत, ग्रामीण गृहनिर्माण योजनेकरिता लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज देणारी सर्वोत्कृष्ट बँक शाखा, शासकीय जागा उपलब्धता व वाळू उपलब्धता सर्वोत्कृष्ट कामगिरी
- प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

### जिल्हास्तरीय पुरस्कार

- सर्वोत्कृष्ट क्लस्टर, सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत, ग्रामीण गृहनिर्माण योजने करिता लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज देणारी सर्वोत्कृष्ट बँक शाखा
- प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

### तालुकास्तरीय पुरस्कार

- सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत, सर्वोत्कृष्ट घरकुल
- प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

### ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कार

- सर्वोत्कृष्ट घरकुल
- प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक

# महा आवास अभियान-ग्रामीण बाबत मान्यवरांचे संदेश

## "प्रत्येक घराला पत्ता आणि पत्त्याला एक घर"

"दि. २० नोव्हेंबर २०२० पासून राज्यात सूरू झालेल्या महा आवास अभियान-ग्रामीण या १०० दिवसांच्या अभियान कालावधीत जास्तीत जास्त घरकुलांची निर्मिती करावी. त्याकरीता लागणारा निधी शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येईल, असे मी आश्वासन देतो.

ज्यांच्याकडे घर नाही त्यांना घर देणे मोठे पुण्याचे काम आहे. तेव्हा प्रत्येक घराला पत्ता आणि पत्त्याला एक घर द्यावे. राज्य व्यवस्थापन कक्षाने या अभियानाची आखणी परिपूर्ण केली असून आलेखनापासून अंमलबजावणी पर्यंत योग्य पध्दतीने नियोजन केले आहे. जिथे नियोजन परिपूर्ण तिथे यश हमखास. त्यामुळे पक्क्या नियोजनाने पक्की घरे हे अभियान देणार आहे यात शंका नाही. घराची बांधणी व गुणवत्ता इतकी सुबक असली पाहिजे की इतर राज्याच्या लोकांनी महाराष्ट्रात येवून घरकुले कशी बांधली हे पाहिले पाहिजे.

शासकीय योजनांशी कृतीसंगम व नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करून लाभार्थ्यांसाठी सर्व सुविधायुक्त पक्की व मजबूत घरकुलाची निर्मिती करण्यासाठी राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून सुरु होणाऱ्या या अभियानाच्या निमित्ताने राज्यातील सर्व शासकीय यंत्रणा, लोकप्रतिनिधी, पंचायतराज संस्था, कॉपोरेट संस्था, तंत्रशिक्षण संस्था, लाभार्थी व लोक यांनी या अभियानात सक्रीय सहभागी होण्याचे आवाहन करतो. या निमित्ताने आता सुरु होत असलेल्या "महा आवास अभियान-ग्रामीण" च्या यशस्वीतेसाठी शुभेच्छा!"

**- मा.ना.श्री. उध्दव ठाकरे,**
**मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**



## 'ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी भरीव निधीची उपलब्धता'

'देशात दरवर्षी २० नोंव्हेंबर हा "राष्ट्रीय आवास दिन" म्हणून राबविण्यात येतो. या वर्षी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत आवास दिनाचे औचित्य साधून राज्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी व त्यात गुणवत्ता आणण्यासाठी "महा आवास अभियान-ग्रामीण" राबविणेबाबत शासनाने निर्णय घेतलेला आहे, याचा मला आनंद वाटतो. या अभियानाव्दारे सर्वांच्या क्षमता बांधणीसाठी कार्यशाळा, माहिती, शिक्षण व संवादाचे उपक्रम याव्दारे सर्वांना सक्रिय सहभागी करुन घेण्यात येत आहे.

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून या १०० दिवसांच्या अभियानातून राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्र अधिक गतीमान होणार आहे. या योजनांच्या यशस्वीतेसाठी शासकीय यंत्रणेबरोबर समाजातील सर्व घटकांचा सक्रिय सहभाग असणे आवश्यक आहे. याकामी सर्व जिल्हा परीषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत पदाधिकारी व सदस्य यांच्या सक्रिय सहभागाबरोबर ग्राम विकास विभागाची क्षेत्रीय यंत्रणा आघाडीवर राहील असा मला विश्वास वाटतो. अभियानात चांगले काम करणाऱ्यांना पुरस्कार देऊन त्यांच्या कामाचा गौरव करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र शासनाने या ग्रामीण गृहनिर्माण योजनांकरीता केंद्र व राज्याच्या माध्यमातून आतापर्यंत भरीव निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. तो कमी पडू दिला जाणार नाही. या निमित्ताने "महा आवास अभियान-ग्रामीण" च्या यशस्वीतेसाठी शुभेच्छा!'

**-मा.ना.श्री. अजित पवार**
**उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**



## "अभियान कालावधीत प्रत्येकाच्या घराचे स्वप्न पूर्ण होणार"

"राज्यातील एकूण लोकसंख्येचा महत्वाचा भाग असलेल्या ग्रामीण भागात ग्राम विकास विभागाच्या माध्यमातून विविध ग्रामीण आवास योजनांमधून शासन बेघरांना सर्व सुविधांनी युक्त असा हक्काचा निवारा पुरविण्यात यशस्वी होत आहे.

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण हे कार्यालय ग्रामीण गृहनिर्माण योजना यशस्वीरीत्या राबवत असून दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते २८ फेब्रुवारी २०२१ या कालावधीत "महा आवास अभियान-ग्रामीण" चे आयोजन केले आहे. या अभियानात ग्राम विकास विभागाच्या अधिनस्त सर्व यंत्रणा मनापासून सक्रिय सहभागी होऊन हे अभियान यशस्वी करतील याचा मला विश्वास वाटतो.

कोरोनामुळे फिजीकल डिस्टन्सींगमुळे दोन ते तीन खोल्याचे घर व घराचे महत्व लोकांना कळले, गरीब लोक घाम गाळून, रक्त जाळून, कर्ज काढून कष्टाने घर उभे करतात. तेव्हा हे अभियान यशस्वी करण्यासाठी क्षेत्रीय भागधारकांनी सहभाग, पुढाकार घेणे गरजेचे आहे. या १०० दिवसात प्रत्येकाचे घराचे स्वप्न पूर्ण करूच याची मला खात्री आहे.

अभियानात ८ लाख घरकुले पूर्ण करावयाची असल्याने १०० टक्के मंजूरी व पहिला हप्ता वितरणावर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. ८ लाख घरकुलांसाठी लागणाऱ्या निधीची उपलब्धता करण्यात आलेली आहे. त्याकरीता मा. उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री व इतर विभागांच्या मंत्र्यांशी माझी सकारात्मक चर्चा झाली आहे. या अभियानासाठी सर्वांना शुभेच्छा!"

**- मा.ना. श्री. हसन मुश्रीफ**
**मंत्री, ग्राम विकास**



## "बेघर, गरीब, गरजू व भूमीहीन माणसाला संजीवनी देणारे अभियान"

"महाराष्ट्र शासनाच्या ग्राम विकास विभागाचे राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण या कार्यालयाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील बेघरांना घर देण्यासाठी केंद्र शासन व राज्य पुरस्कृत आवास योजना अधिक गतीमानपणे अंमलात आणण्यासाठी व त्यामध्ये गुणवत्ता आणणेसाठी "महा आवास अभियान-ग्रामीण" राबविण्यात पुढाकार घेतला याबद्दल मला फार आनंद वाटतो.

महा आवास अभियान-ग्रामीण हे बेघर, गरिब, गरजु व भूमीहीन माणसाला संजीवनी देणार आहे, ज्याप्रमाणे शेतकरी कर्जमाफी झाली, त्याप्रमाणे गरीबांना घरकुल देण्याची योजना असून पुढच्या काही दिवसांमध्ये लाखो लाभार्थ्यांना घरांचा लाभ मिळेल. घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्धता, गृहकर्ज, अतिक्रमण नियमानुकूल करणे व वाळू उपलब्धता याबाबत कोणतीही अडचण येणार नाही व याकरीता महसुल यंत्रणेची मदत मिळेल याचा मला विश्वास आहे.

घरकुला सोबतच गावा गावांमध्ये पायाभूत, मुलभूत सुविधा रस्ते, पाणी, विज व इतर सुविधा ग्राम विकास विभाग व इतर विभागाच्या सहभागातून पूर्ण करणार आहे. शंभर दिवसांच्या या अभियानामुळे ग्रामीण भागातील आवास योजनांच्या प्रगतीला अजून वेग येईल आणि फेब्रुवारी २०२१ अखेर पर्यंत १००% घरकुले पूर्णत्वास येऊन शासनाचे सर्वांसाठी घरे हे ध्येय साध्य होणार असा मला विश्वास वाटतो."

**- मा.ना.श्री. अब्दुल सत्तार**
**राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल**



महा आवास
त्रैमासिक

## 'अभियान यशस्वीतेसाठी सर्व शासकीय यंत्रणेने सहभागी व्हावे'

'सर्वांसाठी घरे २०२२ हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजना अभियान स्वरुपात राबविण्यात येत आहेत.

राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात सुरु असलेल्या कामास अधिक गती देण्यासाठी, त्यातील गुणवत्तावाढीसाठी दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते २८ फेब्रुवारी २०२१ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या "महा आवास अभियान-ग्रामीण" च्या संकल्पनेबाबत मला आनंद वाटतो.

या शंभर दिवसाच्या अभियान कालावधीत सर्व भागधारकांची क्षमता बांधणी, माहिती, शिक्षण व संवाद या बाबींवर भर देऊन अभियानाची उद्दिष्टे साध्य करता येतील. उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था/व्यक्तींना पुरस्कार देवून त्यांना प्रोत्साहीत करण्यात येणार असल्याने ग्रामीण गृहनिर्माण योजनांची अधिक प्रगती होईल याची मला खात्री वाटते.

केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत या गृहनिर्माण योजनांशी संबंधीत विभागांचे सचिव, राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित सर्व शासकीय यंत्रणांनी या १०० दिवसांच्या अभियानात सक्रीय सहभागी होऊन हे अभियान यशस्वी करावे असे मी आवाहन करतो.'

**- मा. श्री. संजय कुमार**
**मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**



## 'अभियानात घरकुलांच्या लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावणार'

'राज्यामध्ये ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात चांगले काम सुरु आहे. घरकुलांच्या कामाची प्रगती फक्त संख्यात्मक न राहता गुणात्मक रहावी, नावीन्यपूर्ण कल्पना अंमलात आणून लाभार्थ्यांना सर्व सुविधांनी युक्त असे घरकुल उपलब्ध करुन द्यावे, तसेच नैसर्गिक आपत्तीस सक्षमपणे सामोरे जाणारे घरकुल बांधण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे शासनाचे ध्येय आहे.

त्या पार्श्वभूमीवर राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृह निर्माण कार्यालयामार्फत "महा आवास अभियान-ग्रामीण" चे माध्यमातून भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधणीसाठी जागा उपलब्धता, वाळूसहीत इतर बांधकाम साहित्यांची उपलब्धता, बहुमजली इमारती, गृहनिर्माण वसाहती, डेमो हाऊसेस, नवनवीन तंत्रज्ञान, इत्यादी बाबींवर लक्ष देण्यात येत आहे. घरांची रंगरंगोटी, विद्युत जोडणी यावरही लक्ष देण्यात यावे.

तसेच शासनाच्या इतर योजना जसे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण, जल जीवन मिशन, प्रधानमंत्री उज्वला योजना, सौभाग्य योजना, राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान, इत्यादींशी कृतीसंगम करुन घरकुलांच्या लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावणार आहे असा मला विश्वास वाटतो.'

**- मा.श्री. राजेश कुमार**
**अतिरिक्त मुख्य सचिव,**
**ग्राम विकास व पंचायत राज विभाग**



# क्षमता बांधणी उपक्रम

## "महा आवास अभियान-ग्रामीण" राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा

मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.उध्दव ठाकरे यांच्या शुभहस्ते मा.मंत्री, ग्राम विकास श्री. हसन मुश्रीफ व मा.राज्यमंत्री, ग्राम विकास, महसूल श्री.अब्दुल सत्तार, मा.मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव श्री.आशिषकुमार सिंह, मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, श्री.विकास खारगे, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक डॉ. राजाराम दिघे व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत दि. २० नोव्हेंबर, २०२० रोजी सायंकाळी ४.०० वाजता सह्याद्री अतिथी गृह, मलबार हिल, मुंबई येथे "महा आवास अभियान-ग्रामीण" राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा सपंन्न झाली.

राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळेला सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी, बँक प्रतिनिधी व मिडीया प्रतिनिधी इ. उपस्थित होते. सदरची कार्यशाळा फिजीकल डिस्टन्सींग पाळून व्हिडीओ कॉन्फरन्सींगच्या माध्यमातून आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेच्या सुरूवातीला राज्य व्यवस्थापन कक्षामार्फत तयार करण्यात आलेला लघुपट दाखविण्यात आला. तदनंतर मा.मुख्यमंत्री महोदयांचे स्वागत मा.मंत्री, ग्राम विकास यांनी केले. मा.मंत्री, ग्राम विकास व मा.राज्यमंत्री, ग्राम विकास व महसूल यांचे स्वागत संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांनी केले.

मान्यवरांच्या स्वागत समारंभानंतर कार्यशाळेचे प्रास्ताविक व अभियानाचे सादरीकरण संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांनी केले. अभियानाचे सादरीकरण करतांना महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्याचे उद्देश, राबवावयाचे उपक्रम, भागधारकांची क्षमता बांधणी, अभियानाचे संनियंत्रण व मूल्यमापन, अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणाऱ्यांना पुरस्कार व जन-जागृतीसाठी राबवयाचे माहिती, शिक्षण व सवांद उपक्रम याबाबत सविस्तर माहिती दिली.




## विभागस्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा

राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळेनंतर महा आवास अभियान-ग्रामीणच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मा. विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील नाशिक, अमरावती, नागपूर, कोकण, पुणे व औरंगाबाद या ६ विभागामध्ये विभागस्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा संपन्न झाल्या.

विभाग स्तरीय कार्यशाळेला जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), अतिरिक्त आयुक्त (सामाजिक न्याय), अतिरिक्त आयुक्त (कामगार), अतिरिक्त आयुक्त (आदिवासी विकास), उप आयुक्त (आदिवासी विकास), उप आयुक्त (सामाजिक न्याय), उपायुक्त (कामगार), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प), सहाय्यक आयुक्त (समाज कल्याण), गट विकास अधिकारी, बँक प्रतिनिधी, जिल्हा माहिती



अधिकारी, मिडीया प्रतिनिधी व विभागीय आयुक्त कार्यालयातील सबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. या कार्यशाळेचे आयोजन व अभियानाचे सादरीकरण उपायुक्त (विकास) यांनी केले.

## जिल्हास्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा

महा आवास अभियान-ग्रामीणच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा परिषद अध्यक्षांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यातील जिल्ह्यांमध्ये जिल्हास्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा संपन्न झाल्या.

जिल्हा स्तरीय कार्यशाळेला मा.खासदार, मा.आमदार, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प), सहाय्यक आयुक्त (समाज कल्याण), पंचायत समिती सभापती, उपसभापती, गट विकास अधिकारी, तहसिलदार, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी व सबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. या कार्यशाळेचे आयोजन व अभियानाचे सादरीकरण प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) यांनी केले.



## तालुकास्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा

महा आवास अभियान-ग्रामीणच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मा. आमदार यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील तालुक्यांमध्ये तालुकास्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा संपन्न झाल्या.

तालुका स्तरीय कार्यशाळेला पंचायत समिती सभापती, उपसभापती, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, गट विकास अधिकारी, तहसिलदार, सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी व सबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. या कार्यशाळेचे आयोजन व अभियानाचे सादरीकरण गट विकास अधिकारी यांनी केले.



## ग्रामस्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा

महा आवास अभियान-ग्रामीणच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली व उपसरपंच यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये ग्रामस्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा संपन्न झाल्या.

ग्रामस्तरीय कार्यशाळेला ग्रामपंचायत सदस्य, लाभार्थी, ग्रामस्थ, ग्रामसेवक, तलाठी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, बँक प्रतिनिधी व सबंधित अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. या कार्यशाळेचे आयोजन व अभियानाचे सादरीकरण ग्रामसभा/गावसभेचे आयोजित करून ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांनी केले.

या कार्यशाळेमध्ये ग्रामपंचायतीमध्ये ग्राम कृती गटाचे गठन करण्यात आले.

# संनियंत्रण आणि मुल्यमापन उपक्रम

## प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) व गटविकास अधिकारी यांच्या विभाग निहाय व्हिडिओ कॉन्फरन्स

राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण आवास योजनांचा आढावा घेण्यासाठी मा.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०३ ते ०६ नोव्हेंबर, २०२० या कालावधीत अनुक्रमे कोंकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर विभागांची व्हिडिओ कॉन्फरन्स आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीला राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी/कर्मचारी व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, विभागीय प्रोग्रामर, जिल्हास्तरीय प्रोग्रामर, जिल्हा व तालुकास्तरीय डाटा एन्ट्री ऑपरेटर उपस्थित होते.

या बैठकींमध्ये घरकुल योजनांची प्रगती, पात्र लाभधारकांची यादी व संख्या प्रमाणित करणे करीता सादर करावयाचे प्रमाणपत्र, आवास प्लस अंतर्गत आधार सिडींग, रिमांड व रिफंड केसेस, प्रलंबित घरकुले (Delayed Houses), PWL मधील लाभार्थ्यांचे आधार सिडींग करणेबाबत, पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, गवंडी प्रशिक्षण कार्यक्रम, AFMS प्रणाली अंतर्गत पंचायत समिती स्तरावर निधीचे नियोजन, नावीन्यपूर्ण उपक्रम, इत्यादि विषयावर सखोल चर्चा करण्यात आली. तसेच दि. ०२/११/२०२० रोजी ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार सोबत झालेल्या बैठकीतील सूचना उपस्थितांना देण्यात आल्या.



## राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी /कर्मचारी यांच्या साप्ताहिक बैठका

"महा आवास अभियान- ग्रामीण" राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा दि. २० नोव्हेंबर, २०२० रोजी घेण्याचे नियोजित असल्याने दि.०२.१०.२०२०, १३.१०.२०२०, १९.१०.२०२०, २६.१०.२०२०, ०२.११.२०२०, ०९.११.२०२०, १३.११.२०२०, ०१.१२.२०२०, ०७.१२.२०२०, १४.१२.२०२० रोजी अभियान शुभारंभ कार्यशाळा पूर्व तयारी व नियोजन याकरीता संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांच्या उपस्थितीत बैठकांचे आयोजन करण्यात आले होते.

महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत योजनांची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन करणे, क्षमतावृध्दी, IEC ची प्रभावी अंमलबजावणी, विविध शासकीय कार्यालयाशी समन्वय साधणे याकरीता ६ विभागकरीता ६ राज्यस्तरीय अधिका-यांची संपर्क अधिकारी नेमणूक करण्यात आली. निधीची उपलब्धतता आणि नियोजन इत्यादी बाबत मार्गदर्शन व चर्चा करण्यात आली. तसेच कक्षातील कर्मचाऱ्यांच्या कामाचा आढावा घेऊन प्रलंबित कामाचा निपटारा करणे, विविध बैठकांचे नियोजन करणे इत्यादी बाबत सूचना देण्यात आल्या.



## ग्रामीण गवंडी प्रशिक्षण (Mason Training) देणाऱ्या संस्थांची बैठक

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाची आढावा बैठक मा.संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष, ग्रामीण गृहनिर्माण यांच्या दालनात दि.०७/१२/२०२० रोजी दु.२.३० वा. घेण्यात आली. या बैठकीला गंवडी प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेचे पदाधिकारी तसेच राज्य व्यवस्थापन कक्षामधील अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. तसेच डेमो हाऊस या उपक्रमाबाबत बैठकीस उपस्थित संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना थोडक्यात माहिती दिली.

ग्रामीण गंवडी प्रशिक्षण विहीत मुदतीत पूर्ण करणे. संस्थाचे अधिकारी/ पदाधिकारी यांनी प्रत्यक्षात क्षेत्रीय भेट देवून अपूर्ण व मंजूरी दिलेली घरकुले जलद गतीने पूर्ण करणे, प्रशिक्षित गवंडयांचे मुल्यांकन सी. एस. डी. सी. आय. मार्फत करणे, गवंडी प्रशिक्षणाचे काम गतिमान व गुणवत्तापूर्ण करणे, लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम करणेसाठी मार्गदर्शक ठरेल असे एक डेमो हाऊस प्रत्येक पंचायत समिती आवारात निर्मितीचे काम संस्थामार्फत करणे या विषयी चर्चा करण्यात आली. तसेच या कार्यक्रमाच्या अंमलबजावणी मध्ये येणाऱ्या अडीअडचणींबाबत सविस्तर चर्चा होऊन या कार्यक्रमाला गती देण्याच्या सूचना देण्यात आल्या.



## औरंगाबाद, जालना व नांदेड जिल्हात राज्यस्तरीय अधिकारी

"महा आवास अभियान- ग्रामीण" या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन करण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्षातर्फे महा आवास अभियान ग्रामीणचे औरंगाबाद विभागाचे संपर्क अधिकारी श्री.राम आघाव (राज्य समन्वयक (IT)) यांनी औरंगाबाद विभागातील औरंगाबाद, जालना व नांदेड जिल्ह्यांचा दौरा केला.

या दौरा कार्यक्रमादरम्यान त्यांनी दि.१६, १७ व १८ डिसेंबर, २०२० या कालावधित अनुक्रमे औरंगाबांद, जालना व नांदेड जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयात प्रकल्प संचालक व सबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थित बैठका घेतल्या.

दि.१८/१२/२०२० रोजी जिल्हा परिषद नांदेड येथे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली श्री. राम आघाव यांच्या उपस्थितीत ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील सबंधित सर्व विभागातील अधिकारी/कर्मचारी यांची आढावा बैठक घेण्यात आली.

श्री. राम आघाव यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकांमध्ये ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी



संनियंत्रण आणि मूल्यमापन करणे, क्षमतावृध्दी, IEC ची प्रभावी अंमलबजावणी, विविध शासकीय कार्यालयाशी समन्वय साधणे, निधीची उपलब्धता आणि नियोजन इत्यादी बाबत चर्चा करण्यात आली.

यासोबतच श्री.राम आघाव यांनी उपस्थितांच्या घरकुल योजना व आवास सॉफ्ट प्रणाली बाबतच्या तांत्रिक अडचणी विषयी बैठकीला उपस्थितांना मार्गदर्शन केले.



या दौरा कार्यक्रमा दरम्यान श्री.राम आघाव यांनी ग्रामपंचायत चोका तालुका, जिल्हा औरंगाबाद येथे क्षेत्रिय भेट दिली. या भेटी दरम्यान ग्रामस्थांशी विविध ग्रामीण घरकुल योजनाची माहिती, जागा उपलब्धता, अतिक्रमण नियमानूकुल करणे व वाळू उपलब्धता इ. विषयांवर चर्चा/मार्गदर्शन केले. क्षेत्रिय भेटी दरम्यान गावातील घरकुलांची पहाणी केली.



## मा. मंत्री, ग्राम विकास यांच्या अध्यक्षतेखाली अभियान आढावा बैठक

मा. मंत्री, ग्राम विकास श्री.हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.राजेश कुमार, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ.राजाराम दिघे व राज्य व्यवस्थापन कक्षाचे अधिकारी/कर्मचारी यांच्या उपस्थितीत दि.१०/१२/२०२० व २३/१२/२०२० रोजी दूरदृष्य प्रणालीव्दारे (VC) "महा आवास अभियान-ग्रामीण" अंतर्गत केंद्र व राज्य पुरस्कृत आवास योजनांच्या प्रगतीबाबत आढावा घेण्यात आला.

या बैठकीमध्ये राज्यातील सर्व विभागीय उप आयुक्त (विकास), मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक व गट विकास अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये प्रथम अभियानात समाविष्ठ १० उपक्रमांच्या अनुषंगाने जिल्हा निहाय आढावा घेण्यात आला. तद्नंतर प्रथम १०० टक्के घरकुल मंजूरी व मंजूर घरकुलांना पहिला हप्ता वितरणावर लक्ष केंद्रीत करणे व त्यानुषंगाने घरकुल मंजूरी व पहिला हप्ता वितरणाबाबत दि.३१ डिसेंबर, २०२० पर्यंत कार्यवाही करणे बाबच्या सूचना मा.मंत्री महोदयांनी बैठकीला उपस्थित असलेल्या सर्व अधिकाऱ्यांना दिल्या.

या बैठकीमध्ये तीसरा हप्ता वितरीत केलेली घरकुल बांधकाम त्वरीत पूर्ण करणे, पंचायत समितीमध्ये डेमो हाऊस बांधकाम, डेमो हाऊस जागा उपब्धता, डेमो हाऊस बांधकामकरीता तांत्रिक अधिकारी नेमणूक व पहिला हप्ता वितरीत करून १२ महिने पूर्ण झालीत अशी घरकुले पूर्ण करणे या विषयांवर चर्चा करण्यात आली.



# माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम

## मा. मुख्यमंत्री यांच्या हस्ते 'महा आवास' त्रैमासिकाचे प्रकाशन

ग्रामीण भागातील केंद्र व राज्य पुरस्कृत घरकुल योजना व ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील घडामोडीचा आढावा घेणारे 'महा आवास' त्रैमासिक राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडून सूरू करण्यात आले आहे.

या त्रैमासिकाच्या पहिल्या अंकाचे प्रकाशन गुरूवार दि.२९ ऑक्टोबर, २०२० रोजी कॅबिनेट बैठकीमध्ये मा.मुख्यमंत्री, श्री. उध्दव ठाकरे यांच्या शुभहस्ते मा.मंत्री, ग्राम विकास, श्री. हसन मुश्रीफ, मा.मंत्री, शालेय शिक्षण, श्रीमती वर्षा गायकवाड, ग्राम विकास विभागाचे मा. अपर मुख्य सचिव डॉ. संजय चहांदे, राज्य व्यवस्थापन कक्षाचे संचालक डॉ.राजाराम दिघे व सर्व सन्माननिय मंत्र्यांच्या उपस्थितीत करण्यात आले.


या त्रैमासिकाच्या जुलै ते सप्टेंबर २०२० या अंकात राज्य व्यवस्थापन कक्षाची भूमिका, राबविण्यात येणाऱ्या ग्रामीण गृहनिर्माण योजना, त्यांची सद्यस्थीती, राबविण्यात येणारे नाविन्यपूर्ण उपक्रम व यशोगाथा याबाबतची माहिती प्रकाशित करण्यात आली.



## दीपावली शुभेच्छापत्र

ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित माहिती, शिक्षण व सवांद यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात.

दीपावली या सणानिमित्त माहे नोव्हेंबर २०२० मध्ये दीपावली शुभेच्छापत्र तयार करण्यात आले. दीपावली शुभेच्छापत्रात दीपावली शुभेच्छासह "महा आवास अभियान-ग्रामीण" या १०० दिवसांच्या अभियानाबाबत थोडक्यात माहिती देण्यात आली. जेणे करून अभियानाची प्रचार, प्रसिध्दी होईल. दीपावली शुभेच्छापत्र गृहनिर्माण क्षेत्रातील सर्व भागधारकांना ई-मेल व्दारे पाठविण्यात आले.






### "महा आवास अभियान-ग्रामीण" राज्यस्तरीय शुभारंभाबाबत मा. मंत्री, ग्राम विकास यांची पत्रकार परिषद

मा. मंत्री, ग्राम विकास श्री.हसन मुश्रीफ यांनी दि.२० नोव्हेंबर, २०२० रोजी पत्रकार परिषद घेऊन "महा आवास अभियान-ग्रामीण" हे दि. २० नोव्हेंबर, २०२० ते २८ फेब्रुवारी २०२१ या १०० दिवसांच्या कालावधीत संपूर्ण राज्यात राबविण्यात येणार असल्याची घोषणा केली.

या अभियान कालावधीत ८,८२,१३५ घरकुलांची निर्मिती, गंवडी प्रशिक्षणाच्या माध्यमातून पक्के व दर्जेदार घरांची निर्मिती, केंद्र व राज्य पुरस्कृत घरकुल योजना अंतर्गत सर्वसाधारण क्षेत्राकरीता रू.१.२० लक्ष व डोंगराळ, नक्षलग्रस्त क्षेत्राकरीता रू. १.३० लक्ष अर्थसहाय्य, या व्यतिरिक्त मनरेगा अंतर्गत ९० दिवसांची अकुशल मजुरी रू.१८,०००/- व स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत शौचालयासाठी रू.१२,०००/- अर्थसहाय्य, दर्जेदार घरकुलांची निर्मिती करण्यासाठी लाभार्थ्यांना बँकेकडून रूपये ७० हजार पर्यंत गृहकर्ज उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे मा.मंत्री महोदयांनी पत्रकार परिषदेत सांगितले.



### अभियान माहिती, शिक्षण व सवांद साहित्य

"महा आवास अभियान-ग्रामीण" राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळेचा शुभारंभ दि.२० नोव्हेंबर, २०२० रोजी सायं.४ वा. सह्याद्री अतिथी गृह, मलबार हिल, मुंबई येथे मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते सपन्न झाला. या कार्यशाळेकरीता अभियान वृत्तपत्र जाहीरात, बॅकड्रॉप, स्टॅण्डी, होर्डींग, पोस्टर, बॅनर, मार्गदर्शक पुस्तिका, घडी पुस्तिका, पॅम्पफ्लेटस, डेमो हाऊस मॉडेल व लघुपट इ. IEC साहित्य राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयामार्फत तयार करण्यात आले व राज्यस्तरीय शुभारंभीय कार्यशाळे करीता त्याचा वापर करण्यात आला.

अभियानाच्या राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळेकरीता तयार करण्यात आलेले सर्व IEC साहित्य विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर होणा-या कार्यशाळांकरीता वापर व्हावा याकरीता सर्व स्तरावर उपलब्ध करून देण्यात आले आहे.




### डेमो हाऊस मॉडेल प्रदर्शन

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी राज्यातील सर्व पंचायत समितीमध्ये डेमो हाऊस उभारण्यात येणार आहे. त्याचीच प्रतिकृती अर्थात डेमो हाऊस मॉडेलचे प्रदर्शन कार्यक्रम स्थळी भरवण्यात आले. ही माडेल्स जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या.



## मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते IEC साहित्याचे प्रकाशन

### अभियान घडी पुस्तिका प्रकाशन

"महा आवास अभियान-ग्रामीण" ची जन-जागृती व प्रचार प्रसिध्दी करीता अभियान राबविण्याचे उद्देश, अभियान कालावधीत राबवावयाचे उपक्रम, क्षमता बांधणी कार्यक्रम, माहिती, शिक्षण व सवांद कार्यक्रम, अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती व त्यांची भूमिका, उत्कृष्ट कामासाठीचे पुरस्कार व पुरस्कार निवडीचे निकष याबाबतची सविस्तर माहिती असलेल्या घडी पुस्तिकेचे प्रकाशन मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते करण्यात आले.

अभियाना विषयी सविस्तर माहिती ग्रामस्तर ते राज्यस्तरार्यंत सर्व घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी घडी पुस्तिका तयार करण्यात आली आहे.




### अभियान मार्गदर्शक पुस्तिका प्रकाशन

दि.२० नोव्हेंबर २०२० ते २८ फेब्रुवारी २०२१ या १०० दिवसांच्या कालावधीत विविध उपक्रम राबवून सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी अधिक गतीमान करणे व गुणवत्ता आणने याकरीता अभियानाची मार्गदर्शक पुस्तिकाचे प्रकाशन मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते करण्यात आले.

अभियान मार्गदर्शक पुस्तिका व महा आवास त्रैमासिक राज्य व्यवस्थापन कक्षामार्फत सर्व विभागीय आयुक्त कार्यालयास पोहोच करून पुढे त्यांचे वाटप जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर करणेत आले.




### अभियान पोस्टर प्रकाशन

"महा आवास अभियान-ग्रामीण" या अभियानाचे उद्देश व अभियान कालावधित राबवावयाचे उपक्रम याबातची थोडक्यात माहिती ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागधारक, लाभार्थी, सर्व सामान्य जनता व इतर शासकीय निमशासकीय अधिकारी, पदाधिकारी यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी पोस्टरचे प्रकाशन मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे हस्ते करण्यात आले. ही पोस्टर्स सर्वांना पाठविण्यात आली.




### राज्य व्यवस्थापन कक्ष -ग्रामीण गृहनिर्माण लोगोचे अनावरण

बोधचिन्ह (Logo) म्हणजे कार्यालयाची ओळख असते. राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे बोधचिन्ह तयार करून त्याचे अनावरण मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते करण्यात आले.



# समन्वयन उपक्रम

## मा. सचिव, आदिवासी विकास विभाग यांची घरकुल योजनांची आढावा बैठक

आदिवासी विकास विभागाच्या ग्रामीण गृहनिर्माण योजनांची आढावा बैठक मा. सचिव, आदिवासी विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.१४.१०.२०२० रोजी दु. १२.०० वा. मंत्रालय, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस आदिवासी विकास आयुक्त, उप सचिव, अवर सचिव, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, उप सचिव, ग्राम विकास विभाग इ. उपस्थित होते.

या बैठकीमध्ये आदिवासी विभागाच्या शबरी आवास योजना, पारधी आवास योजना व आदिम आवास योजनांचा भौतिक व आर्थिक प्रगतीचा आढावा घेण्यात आला. आदिवासी विभागांच्या घरकुल योजने अंतर्गत उद्दिष्टानुसार अप्राप्त रक्कम राज्य व्यवस्थापन कक्षास उपलब्ध करून देणेबाबत चर्चा झाली.

## ग्रामीण गृहनिर्माण व व्ही.एस.टी.एफ. भागीदारी बैठक

संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या अध्यक्षतेखाली ग्राम सामाजिक परिवर्तन अभियान (व्ही.एस.टी.एफ.) च्या अधिका-यांच्या उपस्थितीत दि.१५/१०/२०२०, ०९/११/२०२० व २२/१२/२०२० रोजी राज्य व्यवस्थापन कक्षाच्या कार्यालयात ग्रामीण गृहनिर्माणचा व्ही.एस.टी.एफ. सोबत समन्वय व कृतिसंगम करण्यासंदर्भात बैठका घेण्यात आल्या.

या बैठकांमध्ये ग्रामीण आवास योजनांची माहिती समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी आय.ई.सी. उपक्रमांची अंमलबजावणी व तालुक्यात डेमो हाऊसेस तयार करताना त्यामध्ये व्ही.एस.टी.एफ. मार्फत १०० तालुक्यात कॉप शॉप व त्याकरीता लागणारा अतिरिक्त निधी विषयी चर्चा झाली. या बैठकीला राज्य व्यवस्थापन कक्षातील अधिकारी/कर्मचारी, व्ही.एस.टी.एफ.चे अभियान व्यवस्थापक श्री. प्रफुल्ल रंगारी, अभियान व्यवस्थापक श्री. सागर शिर्के व कार्यक्रम व्यवस्थापक श्री. चंद्रकांत माळी उपस्थित होते.



## ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांची प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणची आढावा बैठक

दि. १६.१०.२०२०, ०२.११.२०२०, २०.११.२०२०, २३.११.२०२० व २१.१२.२०२० रोजी अनुक्रमे मा. अतिरिक्त सचिव, मा. महासंचालक, मा. मंत्री व मा. सचिव ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी व्हिडोओ कॉन्फरन्स व्दारे प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणचा आढावा घेतला. या बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्यातून संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण तसेच कक्षातील अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.



सदर बैठकीमध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत महाराष्ट्र राज्याच्या कामाचा सविस्तर आढावा घेऊन ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकारचे अधिकारी/पदाधिकारी यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुलांच्या उद्दिष्टा प्रमाणे घरकुलांना मंजूरी देणे व अपूर्ण घरकुले तात्काळ पूर्ण करणे, प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत कायम स्वरुपी यादीमधील (PWL) मधील या लाभार्थ्यांकडे बांधकामासाठी जागा उपलब्ध व इतर अडचणीवर मार्ग काढून घरकुले पूर्ण करणे Awaas+ मधून अपात्र कुटुंबांची नावे कमी करणे, इंदिरा आवास योजना अंतर्गत अपूर्ण घरकुले दिनांक ३१ डिसेंबर, २०२० पर्यंत पूर्ण करणे, आवास प्लस मधील सर्व्हे झालेल्या अर्जदारांचे व कुटुंबाचे आधार सिडींग करणेबाबत कार्यवाही पूर्ण करणे अशा सूचना उपस्थितांना देण्यात आल्या.

## मा. मंत्री व मा. प्रधान सचिव यांच्या मंत्रालय, मुंबई येथील बैठका

मा. प्रधान सचिव (आदिवासी विकास विभाग), मा. प्रधान सचिव (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) व दि.२९/१२/२०२० रोजी मा.मंत्री, महसूल यांना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांनी महा आवास अभियान-ग्रामीण या १०० दिवसांच्या अभियाना विषयी चर्चा केली व अभियानाचा शासन निर्णय, अभियानाची मार्गदर्शक पुस्तिका, अभियानाचे पोस्टर, अभियानाची घडी पुस्तिका व महा आवास त्रैमासिकाचा अंक इत्यादी साहित्य दिले. तसेच घरकुल योजना पूर्ण करण्याकरीता निधी उपलब्धतेबाबत सबंधित विभागांच्या मा.प्रधान सचिवांशी चर्चा केली.

दि.२७ नोव्हेंबर, २०२० रोजी मा.प्रधान सचिव, वित्त यांच्या अधयक्षतेखाली घरकुल योजना करीता आवश्यक निधी उपब्धतेबाबत बैठक घेण्यात आली. याबैठकीला राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक, उप संचालक, सहाय्यक संचालक (लेखा), सहाय्यक लेखाधिकारी उपस्थित होते.



## ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार कार्यालयाचे सल्लागार यांचा मुंबई दौरा

श्री. दिपांशू यादव, सल्लागार ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी दि.२१/१२/२०२० रोजी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक, अधिकारी व कर्मचारी यांचेशी गृहनिर्माण योजनांच्या प्रगती व महा आवास अभियान-ग्रामीण विषयी चर्चा केली.

दुपारच्या सत्रात श्री. दिपांशू यादव व श्री. राम आघाव यांनी जिल्हा ग्रामीण विकास कार्यालय, ठाणे येथे ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा आढावा घेतला. तसेच जिल्हास्तरावर आवास सॉफ्ट सबंधीत तांत्रिक अडचणी बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.



## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचा नाशिक व अहमदनगर जिल्ह्यांचा दौरा

"महा आवास अभियान- ग्रामीण" या अभियानाचा व विविध घरकुल योजनांचा आढावा घेणेकामी दि. १८/१२/२०२० रोजी राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक डॉ. राजाराम दिघे यांनी विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक व आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक येथे भेट दिली.

या भेटी दरम्यान आदिवासी विकास आयुक्तालयाचे अतिरिक्त आयुक्त श्री.विकास पानसरे व आदिवासी विकास कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांचेशी डॉ. राजाराम दिघे यांनी आदिवासी विकास विभागाच्या आदिम, शबरी व पारधी या आवास योजनांच्या आर्थिक व भौतिक प्रगती बाबत सविस्तर चर्चा केली.

तद्नंतर डॉ. राजाराम दिघे यांनी मा.विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक डॉ.राधाकृष्ण गमे यांची भेट घेवून महा आवास अभियान-ग्रामीणचे १० उपक्रम व नाशिक विभागातील घरकुल योजनांची आर्थिक व भौतिक प्रगती बाबत चर्चा केली.

दि.२४/१२/२०२० रोजी अहमदनगर जिल्ह्यातील संगमनेर पंचायत समिती येथे ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील सबंधित सर्व विभागातील अधिकारी/कर्मचारी यांच्या घरकुल योजनांच्या प्रगती बाबत आढावा बैठका घेतल्या. तसेच या बैठकीमध्ये योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संनियंत्रण आणि मूल्यमापन करणे, क्षमतावृध्दी, IEC ची प्रभावी अंमलबाावणी, विविध शासकीय कार्यालयांशी समन्वय साधणे, निधीची उपलब्धतता आणि नियोजन इत्यादी बाबत चर्चा व मार्गदर्शन केले.

या दौरा कार्यक्रमात मा. संचालक यांनी ग्रामपंचायत लोणी बु., ता. राहाता, जि. अहमदनगर येथे भेट देऊन गृहसंकुल व घरकुलाच्या कामांची पहाणी केली व १०० टक्के मंजुरी, पहिल्या हप्त्याचे १०० टक्के वाटप करणेबाबत संपर्क अधिकारी डॉ. तुंबारे व गट विकास अधिकारी समर्थ शेवाळे यांना सूचना दिल्या.




## मा. समाज कल्याण आयुक्तांशी बैठक

दि. २२/१०/२०२० रोजी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक डॉ.राजाराम दिघे यांनी पुणे येथे मा.आयुक्त, समाज कल्याण श्री.प्रशांत नारनवरे यांची भेट घेतली.

या भेटी दरम्यान समाज कल्याण विभागाकडील रमाई आवास योजनेच्या आर्थिक व भौतिक प्रगतीबाबत चर्चा करण्यात आली. तसेच महा आवास अभियान-ग्रामीण या १०० दिवसांच्या कालावधीत राबविण्यात येणारे उपक्रम व भागधारकांचा सहभाग व त्याबाबतच्या नियोजनाबाबत माहिती दिली.

डॉ.राजाराम दिघे यांनी समाज कल्याण विभागातील सर्व स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांनी अभियानात सक्रीय सहभागी होऊन अभियान यशस्वी करणे बाबत आवाहन करण्याची विनंती मा.आयुक्त समाज कल्याण श्री.प्रशांत नारनवरे यांना केली.



# केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबधित पॉलिसी इनपुट

## महा आवास अभियान-ग्रामीण

ग्रामीण गृहनिर्माण योजना संदर्भात अडचणींचा अभ्यास करून तसेच योजना अधिक कार्यक्षमतेने राबविण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्षाकडून विविध प्रस्ताव सादर करण्यात येतात व त्यानुसार धोरणात्मक निर्णय केंद्र व राज्य शासनाकडून घेण्यात येतात.

कोरोना महामारीच्या संकटामुळे संपूर्ण देशभरात लॉकडाऊन असल्यामुळे भौतिक असो वा आर्थिक प्रगतीचा वेग मंदावला होता. याचा फटका सर्वच योजना, लाभार्थी व भागधारकांना बसला. आता खरी गरज होती ती गृहनिर्माण क्षेत्रात गतीमानता आणण्याची. त्याकरीता राज्य व्यवस्थापन कक्षाकडून केंद्र व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनांना गतिमान करणे व गुणवत्ता वाढीसाठी सन २०२०-२१ यावर्षामध्ये राबविण्याच्या उपक्रमांचा आराखडा तयार करण्यात आला आणि त्यातूनच संचालक यांच्या संकल्पनेतून उदयास आले "महा आवास अभियान-ग्रामीण"!

दरवर्षी २० नोव्हेंबर हा '**राष्ट्रीय आवास दिन**' म्हणून राबविण्यात येतो. या वर्षी आवास दिनाचे औचित्य साधून राज्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी व गुणवत्तावाढीसाठी "महा आवास अभियान-ग्रामीण" राबविण्याचा प्रस्ताव संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गहनिर्माण कार्यालयाने शासनाकडे सादर केला.

"महा आवास अभियान-ग्रामीण" ही संकल्पना मा. अतिरिक्त मुख्य सचिवस ग्राम विकास व पंचायत राज विभाग व मा.मंत्री, ग्राम विकास यांना घरकुल योजनांच्या प्रगतीच्या दृष्टीने उपयुक्त वाटली. त्यानुसार ग्राम विकास विभाग, यांचेकडील शासन निर्णय क्रमांकः प्रआयो-२०२०/प्र.क्र.१०७/योजना-१०, दि.१९/११/२०२० अन्वये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध आवास योजनांना गतिमान करणे व गुणवत्ता वाढीसाठी सन २०२०-२१ यावर्षामध्ये महाराष्ट्र राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२० रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून दिनांक २० नोव्हेंबर २०२० ते २८ फेब्रुवारी २०२१ या १०० दिवसांच्या कालावधीत "महा आवास अभियान-ग्रामीण" राबविण्यास शासनाकडून मान्यता देण्यात आली.

## डेमो हाऊस बांधकामाबाबत मार्गदर्शक सुचना

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार डेमो हाऊस बांधकामासाठी सात प्रकारच्या प्रकल्प अंमलबजावणी संस्थांचा (PIA) पर्याय देण्यात आला आहे. राज्यस्तरावरून विकेंद्रित पद्धतीला प्राधान्य देऊन त्यापैकी जिल्हा स्तरावरील शासकीय यंत्रणा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग या पर्यायाची प्रकल्प अंमलबजावणी संस्था म्हणुन निश्चिती करण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालय, नवी मुंबई, महाराष्ट्र यांनी केंद्र शासनाकडे सादर केला होता.

राज्य व्यवस्थापन कक्षाने सादर केलेल्या प्रस्तावाला केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. अशा प्रकारे प्रकल्प अंमलबजावणी संस्था नेमणेबाबत महाराष्ट्र राज्या सोबतच संपूर्ण भारतात परवानगी देण्यात आली आहे.

# प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण सन २०१६-१७ ते २०२०-२१
# संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर २०२०

| अ.क्र | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर घरकुले | पूर्ण झालेली घरकुले | | स्टेट रँक | नॅशनल रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | संख्या | टक्केवारी % | | |
| १ | पालघर | २६९६६ | २५७५९ | २११०६ | ७८.२७ | १ | २३६ |
| २ | ठाणे | ७३९५ | ६५६० | ५६६४ | ७६.५९ | २ | २३९ |
| ३ | रायगड | ९५६६ | ७३८२ | ५९१९ | ६१.८८ | ४ | ३२६ |
| ४ | सिंधुदुर्ग | ४९४७ | ३५०८ | २५४८ | ५१.५१ | १० | १०३ |
| ५ | रत्नागिरी | ८१०० | ६४७१ | ३८७२ | ४७.८० | १४ | १६४ |
| | **कोकण विभाग** | **५६९७४** | **४९६८०** | **३९१०९** | **६८.६४** | **१** | **१** |
| ६ | नाशिक | ७२६३० | ६७६४२ | ४९०८२ | ६७.५८ | ३ | १५० |
| ७ | धुळे | ५२६१४ | ४४७६२ | ३०९३३ | ५८.७९ | ५ | २०८ |
| ८ | नंदुरबार | १११९५६ | ९८७५० | ६३७९१ | ५६.९८ | ६ | २०२ |
| ९ | अहमदनगर | ५६१३४ | ४०५८४ | २१७६३ | ३८.७७ | २८ | ३८६ |
| १० | जळगाव | ७५७२३ | ५०१५८ | २९२७५ | ३८.६६ | २९ | ४२३ |
| | **नाशिक विभाग** | **३६९०५७** | **३०१८९६** | **१९४८४४** | **५२.८०** | **२** | **२** |
| ११ | लातुर | ११३०२ | ८९३४ | ६४३८ | ५६.९६ | ७ | ३१८ |
| १२ | हिंगोली | ११३३५ | ८५९६ | ६१०९ | ५३.९० | ८ | २४७ |
| १३ | परभणी | ७६०३ | ६६१९ | ३९४९ | ५१.९४ | ९ | ३२१ |
| १४ | उस्मानाबाद | ६६३२ | ५२०२ | ३२२४ | ४८.६१ | १२ | २७१ |
| १५ | औरंगाबाद | २३२७३ | २१९९३ | ११०४७ | ४७.४७ | १६ | ३२२ |
| १६ | जालना | १३४६५ | ९७९६ | ६००३ | ४४.५८ | २१ | ४०३ |
| १७ | बीड | २०३२० | १७७७२ | ८९१५ | ४३.८७ | २३ | ३११ |
| १८ | नांदेड | ५०७९१ | ४२३३४ | १८३२१ | ३६.०७ | ३१ | ४२८ |
| | **औरंगाबाद विभाग** | **१४४७२१** | **१२१२४६** | **६४००६** | **४४.२३** | **३** | **३** |
| १९ | यवतमाळ | ४१५२१ | ३७६१८ | १९९९९ | ४८.१७ | १३ | ३१६ |
| २० | बुलढाणा | ३०६०४ | २१४३४ | १४५४८ | ४७.५४ | १५ | ३४१ |
| २१ | वाशिम | ११०९१ | ७६२८ | ५२५७ | ४७.४० | १७ | ३४० |
| २२ | अकोला | ४७१८१ | ३४४४७ | १९९८४ | ४२.३६ | २४ | ३६९ |
| २३ | अमरावती | ९३२७२ | ५७०३४ | ३८४९९ | ४१.२८ | २५ | ३५५ |
| २४ | **अमरावती विभाग** | **२२३६६९** | **१५८१६१** | **९८२८७** | **४३.९४** | **४** | **४** |
| | कोल्हापुर | १७०४७ | १२९९८ | ७९५९ | ४६.६९ | १९ | २३० |
| २५ | सातारा | १४१६६ | १११८० | ६३६० | ४४.९० | २० | ३३४ |
| २६ | पुणे | २१८१८ | १४२५४ | ८८९३ | ४०.७६ | २६ | ३७८ |
| २७ | सांगली | २२१७२ | १४६८६ | ८८६० | ३९.९६ | २७ | २८९ |
| २८ | सोलापुर | ४९५०० | ३४५६८ | १९००४ | ३८.३९ | ३० | ३२४ |
| २९ | **पुणे विभाग** | **१२४७०३** | **८७६८६** | **५१०७६** | **४०.९६** | **५** | **५** |
| | चंद्रपुर | ३२६९४ | २७८६२ | १५९०७ | ४८.६५ | ११ | ३२३ |
| ३० | गडचिरोली | २३७४६ | २१२४० | ११२५२ | ४७.३८ | १८ | ३३८ |
| ३१ | वर्धा | १७५७५ | १३०३७ | ७७३६ | ४४.०२ | २२ | २७५ |
| ३२ | भंडारा | ६३५९७ | ४७३८० | २०८५८ | ३२.८० | ३२ | ३२० |
| ३३ | नागपुर | ४५७९२ | ३२२५० | १४८४० | ३२.४१ | ३३ | ४११ |
| ३४ | गोंदिया | ९२८६२ | ८०२६० | २५५३० | २७.४९ | ३४ | ३६८ |
| | **नागपुर विभाग** | **२७६२६६** | **२२२०२९** | **९६१२३** | **३४.७९** | **६** | **६** |
| | **एकूण महाराष्ट्र** | ११९५३९० | ९४०६९८ | ५४३४४५ | ४५.४६१७३२१५ | | |

# रमाई आवास योजना सन २०१६-१७ ते २०१९-२०
## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर २०२०

| अ.क्र | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर घरकुले | पूर्ण झालेली घरकुले | | State Rank |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | संख्या | टक्केवारी % | |
| १ | रत्नागिरी | ५६८४ | ५६८० | ४४८७ | ७८.९४ | १ |
| २ | सिंधुदुर्ग | १७७५ | १७६४ | १३९३ | ७८.४८ | २ |
| ३ | रायगड | १६८९ | १६७१ | ११८२ | ६९.९८ | ७ |
| ४ | ठाणे | १०२१ | ८७३ | ६४७ | ६३.३७ | ११ |
| ५ | पालघर | ४४६ | ३८६ | २२१ | ४९.५५ | २५ |
| | **कोकण विभाग** | **१०६१५** | **१०३७४** | **७९३०** | **७४.७१** | **१** |
| ६ | कोल्हापुर | १०८८२ | १०८१७ | ७८२५ | ७१.९१ | ३ |
| ७ | सोलापुर | १४५९७ | १४२७४ | १०४२५ | ७१.४२ | ४ |
| ८ | सातारा | ९४०८ | ९३९६ | ६६६५ | ७०.८४ | ६ |
| ९ | सांगली | ६९८४ | ६२४४ | ४५६८ | ६५.४१ | ८ |
| १० | पुणे | ८०५९ | ६७१७ | ५०११ | ६२.१८ | १४ |
| | **पुणे विभाग** | **४९९३०** | **४७४४८** | **३४४९४** | **६९.०८** | **२** |
| ११ | धुळे | ५५४९ | ५२४० | ३३६९ | ६०.७१ | १६ |
| १२ | अहमदनगर | २६८१८ | २४५८३ | १४२८२ | ५३.२६ | १९ |
| १३ | नाशिक | ९२७७ | ९०९३ | ४८७६ | ५२.५६ | २० |
| १४ | जळगाव | १२३५१ | ११३७२ | ६१९२ | ५०.१३ | २३ |
| १५ | नंदुरबार | २७१९ | २३०७ | १२२३ | ४४.९८ | २८ |
| | **नाशिक विभाग** | **५६७१४** | **५२५९५** | **२९९४२** | **५२.७९** | **३** |
| १६ | बुलढाणा | १०९११ | १०७१७ | ६८४५ | ६२.७३ | १३ |
| १७ | अमरावती | १०२९२ | १००२९ | ५८०२ | ५६.३७ | १७ |
| १८ | वाशिम | ७१६६ | ७१५४ | ३६०५ | ५०.३१ | २२ |
| १९ | यवतमाळ | १२३४१ | १२१७५ | ६१३४ | ४९.७० | २४ |
| २० | अकोला | १२४०२ | ११९८५ | ५३१७ | ४२.८७ | २९ |
| | **अमरावती विभाग** | **५३११२** | **५२०६०** | **२७७०३** | **५२.१६** | **४** |
| २१ | नागपुर | ७०३९ | ६९१९ | ५०१३ | ७१.२२ | ५ |
| २२ | वर्धा | ५६३२ | ५६३२ | ३६६१ | ६५.०० | १० |
| २३ | भंडारा | ११०७५ | १०३६२ | ६८०३ | ६१.४३ | १५ |
| २४ | गडचिरोली | ५८८० | ५७१७ | २८४९ | ४८.४५ | २६ |
| २५ | गोंदिया | ११६२५ | ७५७१ | ४१४० | ३५.६१ | ३० |
| २६ | चंद्रपुर | १८८७३ | ११५५३ | ६०४६ | ३२.०४ | ३३ |
| | **नागपुर विभाग** | **६०१२४** | **४७७५४** | **२८५१२** | **४७.४२** | **५** |
| २७ | परभणी | १३८४१ | १२८११ | ९०२१ | ६५.१८ | ९ |
| २८ | हिंगोली | ६७२८ | ५६४६ | ४२२५ | ६२.८० | १२ |
| २९ | लातुर | १९३८५ | १५६१४ | १०३८७ | ५३.५८ | १८ |
| ३० | बीड | १२५४७ | ८५५० | ६४९८ | ५१.७९ | २१ |
| ३१ | जालना | ६६३४ | ४६६२ | ३१२३ | ४७.०८ | २७ |
| ३२ | औरंगाबाद | १५३५६ | १४२१८ | ५१८२ | ३३.७५ | ३१ |
| ३३ | नांदेड | १६३०० | ९६८३ | ५२७९ | ३२.३९ | ३२ |
| ३४ | उस्मानाबाद | १४४४७ | ७७०९ | ४३१८ | २९.८९ | ३४ |
| | **औरंगाबाद विभाग** | **१०५२३८** | **७८८९३** | **४८०३३** | **४५.६४** | **६** |
| | **एकूण महाराष्ट्र** | **३३५७३३** | **२८९१२४** | **१७६६१४** | **५२.६१** | |

# शबरी आवास योजना सन २०१६-१७ ते २०१९-२०
# संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर २०२०

| अ.क्र | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर घरकुले | पूर्ण झालेली घरकुले | | स्टेट रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | संख्या | टक्केवारी % | |
| १ | सिंधुदुर्ग | २२ | २२ | २२ | १००.०० | १ |
| २ | रायगड | १२२३ | १२२० | १०५९ | ८६.५९ | २ |
| ३ | ठाणे | १६३३ | १६२९ | १३८६ | ८४.८७ | ३ |
| ४ | रत्नागिरी | १७९ | १७९ | १२० | ६७.०४ | १० |
| ५ | पालघर | ५३५८ | ५२०७ | ३४८० | ६४.९५ | १२ |
| | **कोकण विभाग** | **८४१५** | **८२५७** | **६०६७** | **७२.१०** | **१** |
| ६ | सोलापुर | ६०१ | ५६६ | ५१० | ८४.८६ | ४ |
| ७ | सातारा | १२७ | १०४ | ९२ | ७२.४४ | ६ |
| ८ | सांगली | ६० | ४८ | ४१ | ६८.३३ | ९ |
| ९ | पुणे | २१९१ | २१६९ | १२८३ | ५८.५६ | १५ |
| १० | कोल्हापुर | ३० | १३ | १३ | ४३.३३ | २६ |
| | **पुणे विभाग** | **३००९** | **२९००** | **१९३९** | **६४.४४** | **२** |
| ११ | धुळे | ६३७० | ६२८६ | ४३९६ | ६९.०१ | ८ |
| १२ | नंदुरबार | ७५७८ | ७५४६ | ५००५ | ६६.०५ | ११ |
| १३ | जळगाव | ४६१५ | ४५५८ | २६७८ | ५८.०३ | १६ |
| १४ | अहमदनगर | ३४५३ | ३३९३ | १८३४ | ५३.११ | १९ |
| १५ | नाशिक | ९७३० | ८८०२ | ४४०९ | ४५.३१ | २४ |
| | **नाशिक विभाग** | **३१७४६** | **३०५८५** | **१८३२२** | **५७.७१** | **३** |
| १६ | बुलढाणा | ९०८ | ९०७ | ५८० | ६३.८८ | १३ |
| १७ | यवतमाळ | ४६९६ | ४६९६ | २६८९ | ५७.२६ | १७ |
| १८ | अमरावती | ३६९८ | ३४१९ | २०९० | ५६.५२ | १८ |
| १९ | वाशिम | ४८२ | ४८१ | २३५ | ४८.७६ | २२ |
| २० | अकोला | १४२२ | १०३९ | ४६१ | ३२.४२ | ३० |
| | **अमरावती विभाग** | **११२०६** | **१०५४२** | **६०५५** | **५४.०३** | **४** |
| २१ | हिंगोली | २९८२ | २७८९ | २१४८ | ७२.०३ | ७ |
| २२ | नांदेड | १०९४ | ८६३ | ६७६ | ६१.७९ | १४ |
| २३ | उस्मानाबाद | १९० | १६४ | ९९ | ५२.११ | २१ |
| २४ | औरंगाबाद | २३५७ | २२३२ | १०१४ | ४३.०२ | २७ |
| २५ | लातुर | ५८० | ४२८ | २४८ | ४२.७६ | २८ |
| २६ | जालना | ४६३ | ४३४ | १४७ | ३१.७५ | ३१ |
| २७ | बीड | ५९७ | ४०४ | १२६ | २१.११ | ३२ |
| २८ | परभणी | ६४६ | ५८० | १११ | १७.१८ | ३३ |
| | **औरंगाबाद विभाग** | **८९०९** | **७८९४** | **४५६९** | **५१.२९** | **५** |
| २९ | नागपुर | २१७३ | २१६७ | १५९० | ७३.१७ | ५ |
| ३० | गोंदिया | १८३५ | १७६७ | ९७३ | ५३.०२ | २० |
| ३१ | वर्धा | २६०२ | २५९२ | ११९७ | ४६.०० | २३ |
| ३२ | गडचिरोली | ३९०७ | ३०४२ | १७१४ | ४३.८७ | २५ |
| ३३ | चंद्रपुर | ५१८२ | ४९४० | १९९९ | ३८.५८ | २९ |
| ३४ | भंडारा | ४३११ | ३९५४ | ५२६ | १२.२० | ३४ |
| | **नागपुर विभाग** | **२००१०** | **१८४६२** | **७९९९** | **३९.९८** | **६** |
| | **एकुण महाराष्ट्र** | **८३२९५** | **७८६४०** | **४४९५१** | **५३.९७** | |

# पारधी आवास योजना सन २०१६-१७ ते २०१८-१९ संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर २०२०

| अ.क्र | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर घरकुले | पूर्ण झालेली घरकुले | | स्टेट रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | संख्या | टक्केवारी % | |
| १ | अहमदनगर | १५९ | १५९ | १४१ | ८८.७ | ३ |
| २ | धुळे | ४३२ | ४३१ | ३८१ | ८८.२ | ४ |
| ३ | जळगाव | ४१७ | ३६१ | २९४ | ७०.५ | १४ |
| ४ | नाशिक | ९२ | ५५ | ५३ | ५७.६ | १७ |
| ५ | नंदुरबार | १० | ० | ० | ०.० | २९ |
| | **नाशिक विभाग** | **१११०** | **१००६** | **८६९** | **७८.३** | **१** |
| ६ | सोलापुर | २३१ | २०१ | १८६ | ८०.५ | ७ |
| ७ | सातारा | २४ | १७ | १५ | ६२.५ | १६ |
| ८ | सांगली | ३८ | २४ | २१ | ५५.३ | १८ |
| ९ | पुणे | १८८ | १३० | ९४ | ५०.० | १९ |
| १० | कोल्हापुर | २३ | ७ | ७ | ३०.४ | २४ |
| | **पुणे विभाग** | **२९३** | **२४२** | **२२२** | **७५.८** | **२** |
| ११ | वाशिम | ६४ | ६३ | ६० | ९३.८ | २ |
| १२ | बुलढाणा | ३७१ | ३७१ | ३१९ | ८६.० | ५ |
| १३ | अमरावती | ४५१ | ४५१ | ३५९ | ७९.६ | ९ |
| १४ | अकोला | ३७४ | ३७३ | २९६ | ७९.१ | १० |
| १५ | यवतमाळ | ५९४ | ५७२ | २७८ | ४६.८ | २० |
| | **अमरावती विभाग** | **१८५४** | **१८३०** | **१३१२** | **७०.८** | **३** |
| १६ | हिंगोली | ३५ | ३५ | ३५ | १००.० | १ |
| १७ | परभणी | ५६ | ५४ | ४७ | ८३.९ | ६ |
| १८ | नांदेड | ५० | ४२ | ४० | ८०.० | ८ |
| १९ | लातुर | १७ | १३ | १३ | ७६.५ | ११ |
| २० | उस्मानाबाद | २४७ | २४७ | १८० | ७२.९ | १३ |
| २१ | बीड | ९२ | ८५ | ६४ | ६९.६ | १५ |
| २२ | औरंगाबाद | ५७ | ४३ | २४ | ४२.१ | २२ |
| २३ | जालना | ३८ | २७ | ५ | १३.२ | २५ |
| | **औरंगाबाद विभाग** | **५९२** | **५४६** | **४०८** | **६८.९** | **४** |
| २४ | वर्धा | ५० | ५० | ३८ | ७६.० | १२ |
| २५ | नागपुर | ४८ | ४६ | २२ | ४५.८ | २१ |
| २६ | चंद्रपुर | ३५ | १९ | १४ | ४०.० | २३ |
| २७ | भंडारा | ० | ० | ० | ०.० | २६ |
| २८ | गडचिरोली | ० | ० | ० | ०.० | २७ |
| २९ | गोंदिया | ० | ० | ० | ०.० | २८ |
| | **नागपुर विभाग** | **१३३** | **११५** | **७४** | **५५.६** | **५** |
| ३० | पालघर | ४० | ० | ० | ०.० | ३० |
| ३१ | रायगड | ५ | ० | ० | ०.० | ३१ |
| ३२ | रत्नागिरी | १ | ० | ० | ०.० | ३२ |
| ३३ | सिंधुदुर्ग | १ | ० | ० | ०.० | ३३ |
| ३४ | ठाणे | २४ | ० | ० | ०.० | ३४ |
| | **कोकण विभाग** | **७१** | **०** | **०** | **०.०** | **६** |
| | **एकूण महाराष्ट्र** | **४२६४** | **३८७६** | **२९८६** | **७०.०** | |

# आदिम आवास योजना सन २०१६-१७ ते २०१९-२०
# संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर २०२०

| अ.क्र | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर घरकुले | पूर्ण झालेली घरकुले | | स्टेट रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | संख्या | टक्केवारी % | |
| १ | सिंधुदुर्ग | ५३ | ४८ | ४७ | ८८.६८ | १ |
| २ | ठाणे | ८४६ | ८४४ | ७१८ | ८४.८७ | २ |
| ३ | रायगड | ९१६ | ९१२ | ७६३ | ८३.३० | ३ |
| ४ | पालघर | ६११ | ४७४ | २९१ | ४७.६३ | ७ |
| | **कोकण विभाग** | **२४२६** | **२२७८** | **१८१९** | **७४.९८** | |
| ५ | यवतमाळ | १५५४ | १५२५ | ८३७ | ५३.८६ | ५ |
| | **अमरावती विभाग** | **१५५४** | **१५२५** | **८३७** | **५३.८६** | |
| ६ | वर्धा | २६ | २६ | २१ | ८०.७७ | ४ |
| ७ | गडचिरोली | १६९० | १३४७ | ९०९ | ५३.७९ | ६ |
| ८ | चंद्रपुर | ६३८ | २९१ | १६३ | २५.५५ | ८ |
| ९ | नागपुर | २२२ | ० | ० | ०.०० | १० |
| | **नागपुर विभाग** | **२५७६** | **१६६४** | **१०९३** | **४२.४३** | |
| १० | नांदेड | ४१९ | ८५ | ५९ | १४.०८ | ९ |
| | **औरंगाबाद विभाग** | **४१९** | **८५** | **५९** | **१४.०८** | |
| ११ | नाशिक | १२ | ० | ० | ०.०० | ११ |
| | **नाशिक विभाग** | **१२** | **०** | **०** | **०** | **५** |
| १२ | पुणे | १९ | ० | ० | ०.०० | १२ |
| | **पुणे वभाग** | **१९** | **०** | **०** | **०** | |
| | **एकूण महाराष्ट्र** | **७००६** | **५५५२** | **३८०८** | **५४.३५** | |

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना
# संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर २०२०

| अ.क्र | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर घरकुले | पूर्ण झालेली घरकुले | | स्टेट रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | संख्या | टक्केवारी % | |
| १ | गोंदिया | २० | २० | १४ | ७०.०० | १ |
| | **नागपुर विभाग** | **२०** | **२०** | **१४** | **७०.००** | |
| ७ | सोलापुर | ४ | ४ | २ | ५०.०० | २ |
| | **पुणे विभाग** | **४** | **४** | **२** | **५०.००** | |
| १२ | यवतमाळ | ८० | २० | १८ | २२.५० | ३ |
| १३ | अमरावती | ४५ | २५ | ९ | २०.०० | ४ |
| | **अमरावती विभाग** | **१२५** | **४५** | **२७** | **२१.६०** | |
| १७ | उस्मानाबाद | ३६७ | २६८ | ३९ | १०.६३ | ५ |
| २२ | लातुर | १० | १० | ० | ०.०० | ६ |
| | **औरंगाबाद विभाग** | **३७७** | **२७८** | **३९** | **१०.६३** | |
| ३० | अहमदनगर | २० | ० | ० | ०.०० | ७ |
| | **नाशिक विभाग** | **२०** | **०** | **०** | **०** | |
| | **एकूण महाराष्ट्र** | **५४६** | **३४७** | **८२** | **१५.०२** | |

# गट विकास अधिकारी ठरले घरकुल दूत

नयाकुंड हे गाव नागपूर विभाग, नागपूर जिल्हा व पारशिवनी तालुक्यातील आहे. तालुक्यापासून साधारणतः ५ कि.मी. अंतरावर आहे. या गावात श्री. सुधीर नामदेव चौव्हान राहत असून त्यांना सन २०१८-१९ मध्ये रमाई आवास योजने अंतर्गत घरकुलाचा लाभ मिळाला.

श्री. सुधीर नामदेव चौव्हान हे पत्नी व दोन मुलांसह अतिशय जीर्ण व पडक्या घरात राहत होते. त्यांचे घर मोडकडीस आल्याने केव्हा पडेल याचा काही भरवसा नव्हता. पावसाळ्यात तर जीव मुठीत घेऊन सर्व कुटूंबीय रात्र जागून काढायचे. दिवसभर मोल-मजूरी, रात्री जागरण यामुळे कुटूंबीयांची प्रकृती बिघडलेली, त्यामुळे दवाखाना आणि आर्थिक ताण राहायचा. कौटुंबीक जबाबदारी व बिकट आर्थिक परिस्थितीमुळे पक्के घर बांधणे शक्य नव्हते.

ग्रामपंचायत नयाकुंड येथे श्री. पी.के. बमनोटे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती पारशिवनी यांनी दिलेल्या भेटी दरम्यान ग्रामस्थांना विविध घरकुल योजनांची माहिती दिली व गावाची पहाणी करतांना श्री. सुधीर नामदेव चौव्हान यांच्या घरी भेट दिली व त्यांची व्यथा ऐकून घेतली. त्यांची व्यथा ऐकून गट विकास अधिकारी यांनी ग्रामस्तरीय व तालुकास्तरीय यंत्रणेला घरकुल योजनेची गावात प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या व श्री. सुधीर नामदेव चौव्हान व त्यांच्या सारख्या गरजूना शासकीय योजनेतून घरकुलाचा लाभ देणेकामी प्रयत्न करू असे आश्वासन दिले. गट विकास अधिकारी यांनी दिलेल्या सूचनेनुसार नयाकुंड गावात घरकुल योजनेची लाभार्थी निवड प्रक्रीया राबविण्यात आली. ग्रामपंचायतीने पाठविलेली लाभार्थी यादी अंतिम निवड समितीकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आली.

श्री. सुधीर नामदेव चौव्हान यांनी पारशिवनी पंचायत समिती कार्यालयात भेट दिली असता, मा. गट विकास अधिकारी व त्यांचे कर्मचारी यांनी घरकुल मंजूर झाले असे श्री. सुधीर नामदेव चौव्हान यांना सांगताच त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्यांनी पंचायत समिती अधिकारी/कर्मचारी यांचे मनःपूर्वक आभार मानले.

श्री. सुधीर नामदेव चौव्हान घरकुल मंजूर झाल्यापासून ते व त्यांचे कुटूंब स्वत: लक्ष देवून गुणवत्ता पुर्ण घरकुलाचे बांधकाम ७ महिन्याच्या आत पूर्ण केले. दिवाळीला घरकुलात गृहप्रवेश व लक्ष्मीपूजन करुन शासनानी दिलेल्या घरकुलात दिवाळी सन आनंदाने साजरा केला. मुला-बाळांसाठी सुरक्षित, व्यवस्थित घर व त्या घरात मुलांना अभ्यासाची गोडी लागली व सामाजिक प्रतिष्ठा वाढली.

श्री. सुधीर नामदेव चौव्हान यांना घरकुला करीता रू. १,२०,०००/- व नरेगाचे रू. १८,०००/- असे मिळून एकूण रू. १,३८,०००/- अनुदान प्राप्त झाले आहे. घरकुलात त्यांचे कुटूंब व मुल-बाळ आनंदाने वास्तव्य करीत आहे. शासकीय योजनेच्या मिळालेल्या घरकुलाच्या लाभाकरीता त्यांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पंचायत समिती व ग्रामपंचायत कार्यालयाचे आभार मानले आहे.



## घरकुल योजनेने साकारले नंदनवन

घुईखेड हे गाव अमरावती विभाग, अमरावती जिल्हा व चांदुर रेल्वे तालुक्यात आहे. चांदुर रेल्वे तालुक्यापासून ग्रामपंचायत घुईखेड साधारणतः १९ कि.मी. अंतरावर आहे.

घुईखेड ग्रामपंचायतीत प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण अंतर्गत सन २०१६-१७ ते २०१९-२० पर्यंत २७७ इतकी घरकुले मंजूर झाली, पैकी १२० पूर्ण झाली व इतर घरकूलांचे काम प्रगतीत आहे. हि ग्रामपंचायत पुनर्वसित असून घरकुल लाभार्थी आपले जीवन प्रकल्पाने तयार केलेल्या टिन शेडमध्ये व्यतीत करत होते. प्रधानमंत्री आवास योजनेतून त्यांना पक्के घरकुल मिळाल्याने त्यांचे जीवनमान उंचावले. पंचायत समिती व ग्रामपंचायत यांनी लाभार्थींची सभा आयोजित केल्या व घरकुल बांधण्यासंदर्भात ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांचेमार्फत मार्गदर्शन करण्यात आले. निधी बाबतची शाश्वती लाभार्थींना दिल्यानंतर लाभार्थींनी घरकुल बांधकामाला सुरूवात केली.

घुईखेड ग्रामपंचायतीपुढे घरकुल बांधण्याकरिता सर्वात मोठा प्रश्न उभा होता तो म्हणजे पाणी! त्यासाठी पंचायत समिती व ग्रामपंचायत यांनी काही अंतरावर बोरवेल करून दिल्या. पाणी प्रश्न मिटल्यावर लाभार्थींनी जलद गतीने घरकुल बांधकामास सुरूवात करून १२० घरकुले प्रत्यक्षात पूर्ण केली.

गावातील घरकुल बांधकाम प्रगती बाबत आढावा बैठका व क्षेत्रिय भेटींच्या माध्यमातून पंचायत समिती गटविकास अधिकारी व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी कामाच्या प्रगतीबाबत नियमित पाठपूरावा केला. तसेच गावाच्या विकासाच्या दृष्टीने गट विकास अधिकारी, गृहनिर्माण अभियंता व ग्रामसेवक यांनी बेंबळा प्रकल्प अधिकारी यांच्याशी वारंवार बैठका घेऊन व पाठपुरावा करून पुनर्वसन अंतर्गत डांबरी रस्त्याचे काम सुरू केले, त्यामुळे दळणवळणाला चालना मिळाली. रोजगार हमीची सांगड घालून पंचायत समितीने प्रत्येक घरकुल लाभार्थ्यांने किमान दोन झाडे लावणे असा अभिनव उपक्रम ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी राबवला व त्यामुळे लाभार्थींनी स्वतःहून झाडे लावण्यास सुरुवात केली.

आता सदर गावाला एखाद्या शहरी कॉलनीचे स्वरूप आले आहे. गावातील ९५ टक्के घरकुले ही स्लॅबची पक्की आहेत. सर्वांनी आपली जबाबदारी व्यवस्थित पार पाडल्यामुळे हे नंदवन साकारण्यात यश आले आहे.

आज तेथील ग्रामस्थ, लाभार्थी अतिशय आनंदाने, गुण्यागोविंदाने नांदतात व आपल्या घरात प्रेमाने वावरतात. शासकीय घरकुल योजनेच्या माध्यमातून त्यांना हक्काचे पक्के घरकुल मिळाले त्याबद्दल समस्त गावक-यांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पंचायत समिती व ग्रामपंचायतीचे अधिकारी, कर्मचारी व पदाधिकारी यांचे आभार मानले आहे.





# जागा खरेदी अर्थसहाय्यामुळे मिळाला निवारा

पंडित दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेमुळे कांडली गावामध्ये लाभार्थ्यांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण झाले आहे.

औरंगाबाद विभाग, हिंगोली जिल्हा व कळमनुर तालुक्यातील कांडल हे गाव तालुक्या पासून २२ कि.मी. अंतरावर असून या गावाची लोकख्या सन २०११ च्या जनगणनेनुसार २५९९ एवढी आहे. गावात प्रमुख व्यवसाय शेती व शेतमजूर असून सर्व जाती धर्माचे कुटूंब राहतात. गावात प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणचे ९५ लाभार्थी व रमाई आवास योजनेचे ४७ लाभार्थी आहेत. गावातील १६ लाभार्थींना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अतंर्गत सन २०१६-१७ मध्ये घरकुल मंजूर झाले होते. परंतु या १६ लाभार्थ्यांना जागा नसल्याने घरकुल बांधकाम करता येत नव्हते. जागे अभावी या बेघर लाभार्थ्यांचे स्वत:च्या घरकुलाचे स्वप्न अपुर्ण राहिले होते.

तेव्हा या १६ लाभार्थ्यांना पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. मनोहर खिल्लारी पाटील व सहा. गट विकास अधिकारी श्री. विजय परिट यांनी पंडित दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजने बद्दल माहिती दिली. यामध्ये लाभार्थ्यांनी एकाच जागी जागा खरेदी करून योजनेचा लाभ घेवुन घरकुल बांधकाम करण्याचे ठरविले. गावात प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत एक नवीन कॉलनी तयार होणार असल्याने या लाभार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण तयार झाले.

नगररचना विभागाच्या अधिकाऱ्यांनी जागेचा नकाशा तयार करून दिला. यामध्ये १९ प्लॉट, दोन रस्ते, सभा मंडप, खेळाचे मैदान, जनावरासांठी गोठे व इतर बाबी समाविष्ठ करण्यात आल्या. जमीन उपलब्ध करणेकामी तहसिल व जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी बहूमुल्य सहकार्य केले.

कांडली गावातील 'संजीवनी सृष्टी' या वसाहतीसाठी पंडीत दीनदयाळ उपाध्याय जागा खरेदी अर्थसहाय्य योजने अंतर्गत प्रस्ताव दाखल करण्यात आले. यामध्ये दुय्यम निबंधक विभागाने बाजार भावाप्रमाणे मूल्यांकन घेऊन तालुका स्तरीय समितीच्या बैठकीचे आयोजन करून समितीच्या संमतीने लाभार्थ्यांचे प्रस्ताव जिल्हा स्तरीय समितीकडे सादर करण्यात आले. जिल्हा स्तरीय समितीकडून प्रस्ताव मान्य झाल्यावर जागा खरेदी बाबतचे अर्थसहाय्य पंचायत समिती कार्यालयामार्फत १६ लाभार्थ्यांना वितरीत करण्यात आले.

कांडल गावातील 'संजीवनी सृष्टी' या वसाहतीचे काम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.आर.बी. शर्मा, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प सचांलक श्री.धनवतंकुमार माळी, सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री.एस. व्ही. गोरे, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. मनोहर खिल्लारी पाटील व सहा. गट विकास अधिकारी श्री. विजय परिट यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले.





# खडतर परिस्थितीतून साकारले घरकुल

'थेंबे थेंबे तळे साचे' या म्हणीला प्रत्येक्षात साकारणारे प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभार्थी श्री. गुलाबसिंग सायसिंग ठाकरे.

श्री. गुलाबसिंग सायसिंग ठाकरे हे नाशिक विभागातील ग्रामपंचायत गोगापूर, तालुका शहादा, जिल्हा नंदुरबार येथील रहिवाशी आहेत. गोगापूर हे गांव शहादा तालुक्या पासून ८ कि.मी. व मुख्यालय नंदुरबार पासून सुमारे ५० कि.मी. अंतरावर आहे. गोमी नदीच्या काठावर वसलेले व प्राचीन शिवलिंग मंदिर या गावाला लाभले आहे. अशा या गावातील रहिवाशी श्री.गुलाबसिंग सायसिंग ठाकरे (MH१३४९४४५) यांचे प्रपत्र ब मध्ये नाव समाविष्ट होते. त्यांचे सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत घरकुल मंजूर झाले.

श्री.गुलाबसिंग सायसिंग ठाकरे ह्यांची घरची परिस्थिती गरीबीची त्यात ७ जणांचे कुटुंब एका कच्च्या कुडाच्या छोट्याशा घरात राहत होते. आजारी वडील, पत्नी, मुले व इतर सदस्य यांचा उदरनिर्वाह करणेही कठीण होते. अशा खडतर परिस्थितीत एक एक पैसा साठवून आपले घराचे स्वप्न पूर्णत्वास नेण्याचा संकल्प श्री. गुलाबसिंग ठाकरेंनी केला.

श्री.गुलाबसिंग सायसिंग ठाकरे यांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने ज्यावेळी घरकुल मंजूर झाले, त्यावेळी त्यांच्याकडे बांधकामासाठी लागणारी पुरेशी साधन सामुग्री नव्हती. तसेच जे पैसे होते त्या पैश्यात घर खर्च करावा की घराचे बांधकाम! अशा परिस्थितीत त्यांनी घरकुलाचा परिपूर्ण लाभ घेण्याचे ठरविले. त्यांची महत्वाकांक्षा व मेहनतीने त्यांनी आपल्या हक्काचे घर प्रत्यक्षात साकारले.

श्री. गुलाबसिंग सायसिंग ठाकरे यांनी प्रधानमंत्री आवास योजनेचा मार्गदर्शक सूचनांनुसार २६९ चौ.फुट बांधकाम करणे अपेक्षित असतानाही त्यांनी ४५० चौ. फुटाचे पक्क्या विटांचे घर, शौचालयासह बांधकाम केले. वडील श्री.सायसिंग फुलसिंग ठाकरे, पत्नी सौ.वन्सीबाई गुलाब ठाकरे आणि मुलगा चि.सुनील गुलाब ठाकरे यांचा घरकुल बांधकामात मोलाचा वाटा आहे.

श्री.गुलाबसिंग सायसिंग ठाकरे यांना घरकुल बांधकामासाठी (PMAYG) अंतर्गत रू.१,२०,०००/- अनुदान प्राप्त झाले. घरकुल बांधकाम मजूरी(MREGS) कडून रू. १८००० सरकारी अनुदान मिळाले.

श्री. गुलाबसिंग सायसिंग ठाकरे यांनी घरात स्वतःचे किरकोळ किराना दुकान सूरू केले आहे. त्यामुळे त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक प्रतिष्ठेत वाढ झाली. त्यांचे पक्के घराचे स्वप्न पूर्ण झाल्यावर गृह प्रवेशाच्या वेळी त्यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व सर्व गृहनिर्माण क्षेत्रातील अधिकारी/कर्मचारी यांचे आभार व्यक्त केले आणि आनंदाने कुटुंबासोबत घरात प्रवेश केला.



# घरकुलासाठी शासकीय जागा उपलब्धता

मावळ तालुक्यातील एक भाग म्हणजे आंदर मावळ. या भागातून आंद्रा नदी उगम पावते व वाहते, म्हणून या प्रदेशाला आंदर मावळ म्हणतात. पुणे विभाग व पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्या पासून साधारण १२ कि.मी अंतरावर टाकवे बुद्रुक ग्रुप ग्रामपंचायत आहे. त्यामध्ये महसुली गाव फळणे, बेला आणि टाकवे यांचा समावेश होतो. या गावामध्ये बहुतांशी लोकवस्ती आदिवासी कातकरी समाजाची आहे. या ग्रामपंचायतीची लोकसंख्या ५९२४ इतकी असून या लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. आज अखेर टाकवे बुद्रुक ग्रामपंचायत मध्ये प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत १३ घरकुले, शबरी योजने अंतर्गत ५ व रमाई योजने अंतर्गत १ लाभार्थीना घरकुलाचा लाभ देणेत आलेला आहे.

मावळ विकास गटामध्ये गृप ग्रामपंचायत टाकवे बुद्रुक येथे घरकुल बांधकाम करणेसाठी अनुसूचित जाती संवर्गातील लाभार्थी पात्र असून सदर लाभार्थ्यांकडे घरकुल बांधकाम करणेसाठी स्वमालकीची जागा नव्हती. हे लाभार्थी कुडाची घरे करून राहत होते. मावळ तालुक्यात पावसाचे प्रमाण जास्त असलेने पावसाळ्यात या लाभार्थीना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असे. ग्रामपंचायत टाकवे बुद्रुक ग्रामविकास अधिकारी श्री. सुभाष भाऊराव बांगर यांनी त्यांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून या लाभार्थ्यांचे गायरान जागेचे प्रस्ताव पंचायत समिती मावळने जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा पुणे या कार्यालयात सादर केले. सदर लाभार्थ्यांना जिल्हाधिकारी कार्यालय पुणे (महसूल शाखा) व्दारा दिनांक ०१/०३/२०१९ रोजी मौजे फळणे येथील गायरान जागा उपलब्ध करून देणेत आली.

दिनांक १७/०२/२०२० रोजी मौजे टाकवे बुद्रुक येथील बेला येथे भूमिपूजन करणेत आले. यावेळी मा. आमदार श्री.सुनील अण्णा शेळके,उप मु.का.अ (पंचायत) श्री.संदीप कोहिनकर, गट विकास अधिकारी श्री.शरदचंद्र माळी, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत अधिकारी/कर्मचारी व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

अनुसूचित जमातीतील घरकुल लाभार्थी यांची कार्यशाळा पंचायत समिती मावळ येथे घेऊन त्यांना घरकुल मंजूरी आदेश, त्यांचे करारनामे, शासनाकडून प्राप्त घरकुल अनुदानाचे विविध टप्पे, तसेच नरेगा मार्फत मिळणारे कुशल मंजुरी बाबत सविस्तर माहिती देणेत आली. सर्वांच्या प्रयत्नांना यश आले व आदिवासी समाजातील लोकांसाठी सुंदर अशा वास्तू उभारण्यात आल्या.

सदरील सर्व घरकुल लाभार्थ्यांना शासनाकडून रुपये १. २० लक्ष व नरेगा अंतर्गत रू. १७५०० रुपये अनुदान प्राप्त झाले. यामध्ये काही हिस्सा लाभार्थीने देऊन उत्तम दर्जाच्या आर. सी. सी. पद्धतीची सुंदर व आकर्षक घरकुले पूर्ण करणेत आली. मान्यवरांच्या हस्ते घरकुल गृहप्रवेश कार्यक्रम घेऊन लाभार्थ्यांना घरकुलाच्या चाव्या देणेत आल्या. गृहप्रवेश करताना या लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान व आनंद ओसांडून वाहत होता.





# घरकुल बांधकामासाठी ग्रामपंचायतीचा पुढाकार

कोळकेवाडी गाव हे कोकण विभाग, रत्नागिरी जिल्हा व चिपळूण तालुक्यातील असून चिपळूण पासून सुमारे २० कि.मी. अंतरावर आहे. कोळकेवाडी गाव हे ३५०७ हजार लोकवस्तीचे व वाडीवार विखुरलेले आहे. मात्र असे असले तरी येथील सर्व ग्रामस्थ एकजुटीने ग्रामस्थांना विकासाची गंगा मिळावी यासाठी प्रयत्न करत असते. याचाच एक भाग म्हणून ग्रामपंचायतीने सर्वांसाठी घरे धोरणातून प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना या योजनातून लाभार्थ्यांना हक्काचे घर मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला आहे.

ग्रामीण असो वा शहरी भागात स्वतःचे घर हे प्रत्येक नागरिकाचे स्वप्न असते. ग्रामीण भागात आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने बरेचदा त्यांचे घराचे स्वप्न हे स्वप्नच राहते. विशेतः आपला कातकरी, धनगर, आदिवासी व सर्वसामान्य माणूस घरकुला पासून वंचित राहतो. प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना या घरकूल योजनांचा माध्यमातून ग्रामपंचायतीने गरजूंना घरकुलाचा लाभ मिळवून दिला. यासोबतच मनरेगा सारख्या योजनांची सांगड घालून लाभार्थ्यांना अतिरिक्त मजुरीद्वारे अनुदानही मिळवून देण्यात आले. यामुळे गावातील धनगरवाडी व आदिवासी वाडया-वस्त्या मधील दुर्लक्षित घटक समाजाच्या प्रवाहात आला व त्यांची भटकंती संपुष्टात आली. त्यांची पुढील पिढी ही शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात पुढे येऊन स्वतःचा उत्कर्ष करू शकली.

आदिवासी/धनगर वस्त्या या गावापासून सुमारे ७ ते ९ कि.मी. अंतरावर आहेत. यांच्याकरीता घरकुले बांधण्यासाठी सर्व लाभार्थ्यांची ग्रामपंचायतीत, प्रसंगी त्यांच्या वाडी-वस्तीत जाऊन त्यांच्याशी चर्चा करून, अडचणी समजून घेऊन, त्यात जागेचा प्रश्न, बांधकाम साहित्य (चिरा, वाळू, सिमेंट इ.), पाण्याची उपलब्धता, रस्त्याचा प्रश्न, सामान वाहण्याचा प्रश्न इ. प्रश्नांवर लोकसहभाग, ग्रामपंचायतीचा पुढाकार व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मदतीने सर्व अडचणींवर मात केली आहे.

डोंगर, दऱ्यात राहणाऱ्या आदिवासी व कातकरी समाजातील लाभार्थ्यांना शासकीय योजनांतून कोळकेवाडी ग्रामपंचायतीने हक्काची घरे दिली आहेत.

सन २०१९-२० मध्ये मंजूर घरकुले वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायत जलद गतीने घरकुले पूर्ण करून लाभार्थ्यांना हक्काचे घर देण्यासाठी प्रयत्नशिल आहे. गावातील सर्व ग्रामस्थ हे विकासाला प्राधान्य देणारे असून गावात प्रत्येक योजना प्राधान्याने राबविली जाते. याकरीता ग्रामपंचायत अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी, तालुका व जिल्हा स्तरीय शासकीय यंत्रणेचे नियमित सहकार्य मिळत आहे. यामुळेच गावाच्या विकासाला गती मिळाली व लाभार्थ्यांचे हक्काचे घरकुल वेळेत पूर्ण करण्यासाठीही त्यांनी मोलाचा वाटा उचलला आहे.





महा आवास
त्रैमासिक

# डेमो हाऊस / प्रात्यक्षिक घरकुल बांधकाम मार्गदर्शक सुचना

केंद्र शासनाने "सर्वांसाठी घरे-२०२२" हे धोरण जाहीर केले असुन त्यानुसार राज्यातील ग्रामीण भागामध्ये बेघर घटकांसाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहेत. या योजने अंतर्गत घरे बांधत असताना हाऊस डिझाइन टायपोलॉजीज आणि अत्याधुनीक तंत्रज्ञानाचा वापर करणे, त्यांना सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या सक्षम बनवणे, बांधकाम खर्च कमी करणे, नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी सक्षम करणे, उच्च प्रतीचे व पर्यावरणपूरक बांधकाम करणे याचा प्राधान्याने विचार करणे आवश्यक आहे.


योजने अंतर्गत लाभार्थ्यांना घरकुल डिझाइन टायपोलॉजीच्या योग्य आकलनासाठी, अशा प्रकारे बांधलेली प्रात्यक्षिक घरे (Demo Houses) त्यांच्या भेटीसाठी उपलब्ध असणे आवश्यक आहे. या घरकुलाच्या डिझाईन्समध्ये सूर्यप्रकाश, वेंटिलेशन, फिनिशिंगचा प्रकार, इत्यादींचा विचार करून त्यात दारे, खिडक्या इत्यादींचा समावेश असेल. अशा प्रकारे स्थानिक भौगोलिक परिस्थितीला अनुकुल असे घरकुल तालुकास्तरावर प्रात्यक्षिक घरकुल (Demo House) म्हणुन लाभार्थ्यांना भेट देण्यासाठी उपलब्ध करुन देता येईल.

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण मार्फत स्थानिक भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन मार्गदर्शनपर राज्यातील ६ विभागांकरिता प्रत्येकी एक याप्रमाणे ६ डिझाईन्स व त्यांची अंदापत्रके विकसीत करण्यात आली आहेत. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पुढील बाबींवर भर देण्यात आला आहे-

१. डेमो हाऊस घरकुल बांधकाम क्षेत्र हे २६९ चौ. फुट क्षेत्रफळाच्या मर्यादेत असावे. डेमो घरकुल हे भूकंप प्रतिरोधक आणि पर्यावरण पूरक असावे.
२. डेमो हाऊसची जागा प्राधान्याने पंचायत समिती प्रांगणातच निश्चित करावी. प्रत्येक तालुक्यासाठी एक या प्रमाणे संपुर्ण राज्यामध्ये एकुण ३५१ डेमो हाऊस बांधावयाचे आहेत.
३. डेमो हाऊस बांधकामासाठी कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद ही प्रकल्प अंमलबाावणी संस्था (PIA) म्हणून राहतील.
४. ग्रामीण गवंडी प्रशिक्षणासाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रशिक्षण संस्थांच्या (TP) मदतीने डेमो हाऊस बांधकामाच्या ठिकाणी गवंडी प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे.
५. डेमो हाऊस बांधकामाकरीता खर्च अधिकतम रु. १,४०,०००/- सपाट प्रदेशाकरीता तसेच रु. १,५०,०००/- डोंगरी क्षेत्राकरीता करता येईल. याव्यतिरिक्त रेन वॉटर हार्वेस्टिंग, Lamp पोस्ट, परसबाग, डेमो घरकुल माहिती फलक, आकस्मिक निधी, डेमो हाऊस बांधकामासाठी नियुक्त तांत्रिक अधिकारी यांचे TA/DA, इत्यादी सुविधांकरिता रू. ५०,०००/- पर्यंत खर्च करता येईल.

डेमो हाऊसचा उपयोग तालुक्यातील घरकुलाच्या लाभार्थ्यांना प्रात्यक्षिक (डेमो) दाखविणे, डेमो हाऊस बांधकामावर ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे व पूर्ण केलेल्या डेमो हाऊसचा उपयोग माहिती कक्ष म्हणुन करणे असा तिहेरी हेतुने करता येईल. मार्गदर्शक सुचनांच्या आधारे प्रत्येक तालुक्यातील डेमो हाऊस बांधकामाची कार्यवाही पूर्ण करण्याबाबत दि.३१/१२/२०२० रोजी मार्गदर्शक सूचनांव्दारे कळविण्यात आले आहे.


# बहुमजली इमारत डिजाईन्स




## पर्याय - १

### ठळक वैशिष्ट्ये

१) जागेचे क्षेत्रफळ १५० चौ. फूट २) तळमजला + १ मजला ३) एका लाभार्थ्या करीता ४) १ खोली, १ किचन आणि एक शौचालयसह स्नानगृह




## पर्याय - २

### ठळक वैशिष्ट्ये

१) जागेचे क्षेत्रफळ ३०० चौ. फूट २) तळमजला + १ मजला ३) दोन लाभार्थ्या करीता ४) प्रत्येक मजल्यावर १ खोली, १ किचन आणि एक शौचालयसह स्नानगृह




| GROUND FLOOR AREA STATEMENT | |
|---|---|
| PLOT AREA | 513 SQFT |
| SUPER BUILT UP AREA | 332 SQFT |
| BUILT UP AREA | 260 SQFT |
| CARPET AREA | 200 SQFT |

## पर्याय - ३

### ठळक वैशिष्ट्ये

१) जागेचे क्षेत्रफळ ५०० चौ. फूट २) तळमजला + २ मजले ३) तीन लाभार्थी करीता ४) प्रत्येक मजल्यावर १ खोली, १ किचन आणि एक शौचालयसह स्नानगृह



## पर्याय - ४

### ठळक वैशिष्ट्ये


१) जागेचे क्षेत्रफळ १००० चौ. फूट २) प्रती मजला २ लाभार्थी ३) ६ लाभार्थी करीता ४) प्रत्येक मजल्यावर १ खोली, १ किचन आणि एक शौचालयसह स्नानगृह


# गृहसंकुल / घरकुल वसाहत डिजाईन्स




### ठळक वैशिष्ट्ये

१) जागेचे क्षेत्रफळ ५५०० चौ. फूट २) तळमजला + मजला ३) १६ लाभार्थी करीता ४) प्रत्येकी १ खोली, १ किचन आणि एक शौचालयसह स्नानगृह ५) तळ मजला छत - RCC ६) इमारतीचे छत - Sloping Roof ७) Carpet Area ३५८४ Sq.Ft. ८) Built up Area - ४४४८ Sq.Ft. ९) Super Built up Area - ५९४० Sq.Ft.






### ठळक वैशिष्ट्ये

१) जागेचे क्षेत्रफळ ५५०० चौ. फूट २) तळमजला + मजला ३) १६ लाभार्थी करीता ४) प्रत्येकी १ खोली, १ किचन आणि एक शौचालयसह स्नानगृह ५) तळ मजला छत - RCC ६) इमारतीचे छत - Sloping Roof ७) Carpet Area ३५८४ Sq.Ft. ८) Built up Area - ४४४८ Sq.Ft. ९) Super Built up Area - ५९४० Sq.Ft.

# फोटो गॅलरी


Divisional Commissioner Office, Pune






REDMI NOTE 9 PRO
AI QUAD CAMERA


जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, सोलापूर.


तालुका स्तरीय कार्यशाळा




जिल्हा परिषद ठाणे / पंचायत समिती मुरबाड
महा आवास अभियान अंतर्गत

## ग्रामीण भागातील घरकुल योजनांची माहिती देणार 'महाआवास'

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते प्रकाशन

## महाआवास अभियानातून ८ लाख घरांची निर्मिती



दै. सामना

## ग्रामीण भागात ८.८२ लाख घरकुलांच्या निर्मितीचा निर्धार

ग्रामीण बेघरांसाठी 'महाआवास अभियान' महत्त्वपूर्ण ठरेल – मुख्यमंत्री उद्धव ठाकरे



दै. नवशक्ति

दै. वित्तबातमी

## ग्रामीण बेघरांसाठी 'महाआवास अभियान' महत्त्वपूर्ण ठरेल - मुख्यमंत्री



नवराष्ट्र

आवास योजना : ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांची घोषणा

## राज्यात शंभर दिवसांत आठ लाख घरकूले



७५० कोटी रुपये घरकुलांसाठी निधी लागणार

१०० दिवसांचा कार्यक्रम आखला

११ लाख घरकुलांना मंजूरी

रखडलेली कामे मार्गी लावणार

३३ हजार गवंड्यांना प्रशिक्षण

ग्रामीण आणि नक्षलग्रस्त भागांसाठी निधी

## जिल्ह्यात महाआवास योजना प्रभावीपणे राबवली जाईल

–पालकमंत्री दादाजी भुसे



लोकमत

प्रधानमंत्री आवास योजना

## ६४ लाभार्थ्यांना मिळणार जागा...



इतर सेवाही पुरविणार...

सीईओ उपस्थित राहणार

पुढारी

## महाआवास अभियान जिल्ह्यात प्रभावीपणे राबवा

पालकमंत्री



## घरकुल योजना पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतींना पाच लाख -आ. बोरनारे



महाराष्ट्र टाइम्स

## घरकुल निर्मितीला पंचायत समितीने गती द्यावी



## महाआवास ग्रामीण अभियानाची विभागीय कार्यशाळा संपन्न

महाआवास योजनेचा उपायुक्त डॉ.अविनाश गोटे यांनी घेतला आढावा



दिव्य मराठी विशेष

## 'आवास'ची कामे गतिमानसह गुणवत्तापूर्ण करा



लोकमत



३७ आदिवासींना गृहप्रवेश

## तहसील में कोई भी व्यक्ति बेघर नहीं रहेगा-हिरुडकर



पुढारी

## केंद्रीय तपासणी पथक पोहोचले लाभार्थींपर्यंत

योजनांच्या अंमलबजावणीची माहिती घेणे सुरू : कामांना भेट, दप्तर तपासणी





महा आवास अभियान-ग्रामीण अंतर्गत कोल्हापूर जिल्ह्याचा भौतिक व आर्थिक प्रगतीचा आढावा घेताना मा.मंत्री, ग्राम विकास श्री. हसन मुश्रीफ व पालमंत्री कोल्हापूर जिल्हा श्री.सतेज पाटील




मा.मंत्री, ग्राम विकास यांच्या अध्यक्षतेखाली मा.अपर मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या उपस्थितीत ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा जिल्हास्तरीय यंत्रणेची व्हिडीओ कॉन्फरन्स व्दारे आढावा बैठक



महा आवास अभियान-ग्रामीण या १०० दिवसांच्या अभियानाची प्रगती, निधी उपलब्धता व IEC साहित्याची माहिती मा.मंत्री, आदिवासी विकास यांना सादर करतांना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण



महा आवास अभियान-ग्रामीण या १०० दिवसांच्या अभियानाची प्रगती, महसूल संदर्भात अडचणी व IEC साहित्याची माहिती मा.मंत्री, महसूल यांना सादर करतांना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण





## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४

Email ID : directoriayruralhousing@gmail.com

दुरध्वनी क्र. : ०२२-२७५६१८२४